नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

AROTE Dental Clinic
smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## सहकार क्षेत्राचे वीज निर्मिती क्षेत्रात पाऊल

### तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्थेबरोबर महत्त्वाचा करार




**मुंबई : (स. गांवकरी)**

जलसंपदा विभाग आणि तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्था मर्यादित यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तीन उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सुमारे ५,२०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार गुरुवारी करण्यात आला. आजपर्यंत एकूण ५९ करार करण्यात आले असून, ८०,५१५ मेगावॅटवर गेली आहे. या करारांमुळे कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर ऊर्जा साठवणूक करून राष्ट्रीय ग्रीड स्थिर ठेवण्याची क्षमता राज्यात निर्माण होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हटले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात हा करार करण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, आमदार डॉ. विनय कोरे, नवशक्ती निर्माण संस्थेचे अध्यक्ष नामदेव एच. पाटील आदी उपस्थित होते. तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्थेच्या वतीने कुंभी ऑफ स्ट्रीम क्लोज्ड लूप उदंचन प्रकल्पाच्या वतीने सिंधुदुर्ग येथे दोन व शाहूवाडी येथे कडवी ऑफ स्ट्रीम क्लोज्ड लूप उदंचन प्रकल्प, असे तीन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या माध्यमातून सुमारे ५,१९९ कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन, ११०० मेगावॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित होणार आहे. या तीनही प्रकल्पांतून १,१०० जणांना रोजगार मिळणार आहे.

राज्याने उदंचन जलविद्युत प्रकल्पांमध्ये आतापर्यंत ८०,००० मेगावॅट क्षमतेचा टप्पा ओलांडला आहे. अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातही मोठी झेप घेतली आहे. अशा परिस्थितीत उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) हे भविष्यातील ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. देशातील अनेक राज्ये सौरऊर्जेमध्ये आघाडीवर आहेत. राजस्थान आणि गुजरातसारख्या राज्यांकडे विस्तीर्ण वाळवंट क्षेत्र असल्याने तेथे मोठ्या प्रमाणावर सौर प्रकल्प उभे राहत आहेत.

मात्र महाराष्ट्राची खरी ताकद पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमध्ये आहे. या करारामुळे राज्यातील ऊर्जा पायाभूत सुविधांना चालना मिळणार असून, भविष्यातील वाढत्या विजेच्या मागणीला तोंड देण्यासाठी महाराष्ट्र सक्षम होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

### पथदर्शी प्रकल्प म्हणून सहकार्य

सहकार क्षेत्राचा ऊर्जा निर्मितीत प्रवेश होत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी वारणा समुहाचे स्वागत केले. वारणा समूहाने विविध क्षेत्रांत उत्तम कामगिरी केली असून, ऊर्जा क्षेत्रातही ते महत्त्वाची भूमिका बजावतील. या प्रकल्पांना पथदर्शी प्रकल्प म्हणून सहकार्य देण्याचा राज्य सरकारचा विचार असून, वीज खरेदी करार (पीपीए) तसेच वित्तीय सहाय्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली जाईल, असेही फडणवीस म्हणाले.



## शिवशाही बस भीषण आगीत जळून खाक

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे स्टेशन जवळील सॅटीस उड्डाणपुलावर दुपारी १:२८ वाजताच्या सुमारास महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची शिवशाही एसी बस क्रमांक- MH 09 EM 9942, (चालक श्री. संतोष किसन गवळी, वाहक - श्री. मिलिंद सोनावणे, मार्ग - स्वारगेट ते वसई.) या बसला ठाणे रेल्वे स्टेशन बस स्थानक येथून वसईला जाताना सॅटिस ब्रिजवरती आग लागली होती. प्रसंगी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वाय. एम. तडवी, ठाणे नगर पोलीस कर्मचारी, ठाणे नगर वाहतूक पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान ०१-फायर वाहनासह, ०१-रेस्क्यू वाहनासह, ०१- वॉटर टँकर वाहनासह, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१-पिकअप वाहनासह व महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे कर्मचारी उपस्थित होते.

सदर आग लागलेली बस ही वसई बस डेपोची असून बस मध्ये स्वारगेट वरून वसईला जाणारे १० प्रवासी व ठाणे येथून ०४ प्रवासी असे एकूण १४ प्रवासी प्रवास करत होते. सदर बसला आग लागताच सर्व प्रवासी व बसचे चालक व वाहक सुरक्षित बसच्या बाहेर आले त्यामुळे अनर्थ टळला परंतू शिवशाही बस पूर्णतः जळून नुकसान झाले आहे. सदर आग लागलेल्या बस मधील डिझेल व ऑइल रस्त्यावरती पसरले होते त्यावरती आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने माती पसरविण्यात आली.

## थोडक्यात...

### प्रेमजी इन्व्हेस्टकडून मोठी गुंतवणूक

नागपूर (स. गांवकरी) :जगातील आघाडीची गुंतवणूक संस्था असलेल्या प्रेमजी इन्व्हेस्टने महाराष्ट्रात रुग्णालय क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. त्यासाठी नागपूर आणि मुंबईत रुग्णालये संचालित करणाऱ्या न्यूएरा रुग्णालय समूहासोबत करार करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यात तीन नवीन अद्ययावत रुग्णालयांची भर पडून सुमारे २०० डॉक्टरांसह एक हजारांहून अधिक इतर कर्मचाऱ्यांना रोजगार मिळेल. तर रुग्णांना रुग्णशय्या वाढल्यामुळे अद्ययावत वैद्यकीय सुविधाही उपलब्ध होणार आहेत. राज्यातील नागपूर शहरात या गुंतवणुकीच्या मदतीने न्यूएरा रुग्णालयांची एकूण क्षमता ३५० खाटांवरून थेट ८०० खाटांपर्यंत वाढेल. त्यामुळे येथे उपचार घेणाऱ्या रुग्णांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवांचा लाभ अधिक व्यापक प्रमाणात मिळणार आहे. सध्या न्यूएरा हॉस्पिटल्सकडून नागपुरात दोन तर नवी मुंबईत एक, अशी एकूण तीन रुग्णालये चालवली जात आहेत. मेंदूरोगाशी संबंधित सर्व अद्ययावत उपचार, अवयव प्रत्यारोपण आणि हृदयरोग उपचार यांसारख्या गुंतागुंतीच्या सेवा येथे उपलब्ध आहेत.

### शरद पवार यांची प्रकृती स्थिर

मुंबई (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे मंगळवारी ब्रिच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची प्रकृती स्थिर असली तरी त्यांच्या तातडीने विविध तपासण्या करण्यात आल्या. यानंतर आता शरद पवार हे त्यांच्या निवास्थानी परतले आहेत. शरद पवारांच्या प्रकृतीबाबत समाज माध्यमांवर चिंता व्यक्त केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते रोहित पवार, जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर पोस्ट करत शरद पवारांच्या प्रकृतीबाबत माहिती दिली आहे. "आदरणीय पवार साहेबांच्या प्रकृतीबाबत अनेक कार्यकर्त्यांनी काळजीपोटी फोन केले असून साहेबांची तब्येत उत्तम आहे. त्यांना हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आल्याने ते मुंबईतील घरी विश्रांती घेत आहे. एका कामासाठी माझंही नुकतंच त्यांच्याशी बोलणंही झालं असून त्यांच्या तब्येतीबाबत कुणीही काळजी करु नये!" अशी पोस्ट रोहित पवारांनी केली आहे.

## दूध भेसळ रोखणार 'एआय' तंत्रज्ञान; मुख्यमंत्र्यांनी दिले महत्त्वाचे आदेश

**मुंबई : (स. गांवकरी)**

राज्यात दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाने टेस्ट स्ट्रीप तयार केली आहे. मात्र, दुधातील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड व आयआयटी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून यंत्रणा तयार करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. राष्ट्रीय डेयरी विकास बोर्डचे अध्यक्ष मीनेश शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या कामकाजाची माहिती दिली. राज्यात सध्या ४० टक्के दूध संघटित क्षेत्रातून प्रक्रिया केले जाते. तर उर्वरित दूध असंघटीत क्षेत्रातून येत असल्याने भेसळीचे प्रमाण मोठया प्रमाणावर आढळते. त्यामुळे अधिकाधिक उत्पादक आणि गावांना संघटित डेअरी व्यवस्थेत आणण्यावर शासनाचा भर आहे. देशभरात ७५ हजार नवीन गावे सहकारी व्यवस्थेत जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळण्यासोबतच भेसळ रोखण्यास मदत होणार आहे. दूध भेसळ रोखण्यासाठी



विशेष टेस्ट स्ट्रिप विकसित करण्यात आली असून, ही स्ट्रिप युरिया तसेच इतर भेसळ घटक ओळखण्यास सक्षम असून, पुढील सहा महिन्यांत ती पूर्णपणे कार्यान्वित होईल. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्य शासनाने केलेल्या सहकार्यामुळे महानंदच्या पुनरुज्जीवनाला गती मिळाली असून, सुमारे ७८ टक्के काम पूर्ण झाले आहे. ३ लाख लिटर क्षमतेचा नवीन ग्रीनफिल्ड डेअरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. महानंदा परिसरात सिग्नेचर पार्लर आणि अत्याधुनिक इमारत उभारण्यात आल्या आहेत. आरे आणि महानंदा यांच्या ब्रँडचे रिलाँचिंग लवकरच करण्यात येईल. मुंबईतील आरे कॉलनीमध्ये कंप्रेस्ड बायोगॅस प्रकल्प तसेच उदगीर येथे महानंदचे नवीन डेअरी प्लांट उभारण्यात येणार आहे.

## राहुरी पोटनिवडणुकीसाठी ५६.२० टक्के मतदान

### *उन्हाची तीव्रता आणि निरुत्साही वातावरणाचा परिणाम*



**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आज, गुरुवारी ५६.२० टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अनुपकुमार यादव यांनी दिली. एकूण ३ लाख ३३ हजार ५४५ मतदारांपैकी १ लाख ८७ हजार ४६३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. पोटनिवडणुकीचे निरूत्साही वातावरण, प्रचारात निर्माण न झालेली रंगत आणि उन्हाची तीव्रता याचा परिणाम राहुरीच्या मतदानावर झालेला दिसला. सायंकाळी पाचपर्यंत ५०.७४ टक्के मतदान झाले होते. उन्हाची तीव्रता कमी झाल्यानंतर, सायंकाळी पाचनंतर मतदान केंद्रावर काहीशी गर्दी निर्माण झाली.

राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा वगळून उर्वरित तालुका, अहिल्यानगर तालुक्यातील २७ गावे व पाथर्डी तालुक्यातील ३९ गावे मिळून मतदारसंघ आहे. सर्वाधिक मतदार संख्या राहुरी तालुक्यात आहे. सध्या कांद्याची कापणी सुरू आहे, त्यामुळे मजूर शेतीकामात अडकलेले आहेत. त्याचाही काहीसा परिणाम मतदानावर झाला. मतदान घडवून आणण्यासाठी उमेदवारांच्या यंत्रणा सक्रिय होत्या. मात्र त्याला दुपारपर्यंत अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. काही ठिकाणी लक्ष्मीदर्शन झाल्यानंतर केंद्रांवर मतदानाच्या रांगा लागल्याची चर्चा होती.

निवडणूक रिंगणातील भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी बुऱ्हाणनगरमध्ये, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) गोविंद मोकाटे यांनी इमामपूर तर ठाकरे गटाचे बंडखोर रावसाहेब खेवरे यांनी देसवंडी गावात मतदान केले. वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके यांच्यासह निवडणूक रिंगणात एकूण सात उमेदवार आहेत. गेल्या सन २०२४ मधील सार्वत्रिक निवडणुकीपेक्षा यंदा सुमारे ९ हजाराने मतदार वाढले. त्यावेळी ७४.५२ टक्के मतदान झाले होते. सकाळी उन्हाची तीव्रता वाढण्यापूर्वी राहुरी शहर तसेच अहिल्यानगर शहरालगतच्या गावातील मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा आढळल्या. दुपारी बारानंतर मात्र अनेक मतदान केंद्र ओस पडलेली होती. सायंकाळी पाचनंतर पुन्हा काही ठिकाणी रांगा दिसून आल्या. निवडणूक यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीनुसार दगडवाडी मतदान केंद्रावर मतदान यंत्र बंद पडल्याने ते बदलण्यात आले तसेच वांबोरी मतदान केंद्रावर व्हीव्हीपॅट यंत्र बंद पडल्याने तेही बदलण्यात आले.

उन्हाच्या तीव्रतेमुळे निवडणूक यंत्रणेने काही मतदान केंद्रासमोर मंडप टाकून सावलीची व्यवस्था केली होती तसेच काही ठिकाणी पिण्याचे पाणीही ठेवलेले होते. मात्र हे चित्र सार्वत्रिक नव्हते. अनेक मतदान केंद्रावर केवळ भाजपचे बुथ आढळले. इतर विरोधी उमेदवारांचे बूथ उभारले गेले नव्हते. परिणामी मतदान घडवून आणण्यात फारशी चुरस आढळली नाही. भाजपसाठी काहीसे एकतर्फी वातावरण निर्माण झालेले दिसले. उमेदवारी दाखल न करून इतर कोणाच्याही प्रचारात सक्रिय नसलेले शरद पवार गटाचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी अखेरच्या क्षणी आपल्या समर्थकांना गाव पातळीवर परिस्थिती लक्षात घेऊन सक्रिय होण्याची मोकळीक दिली होती.

## सरकारी कर्मचाऱ्यांचा संप चौथ्या दिवशीही सुरूच राहणार!

### तोडगा नाहीच; मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीची प्रतीक्षा




**मुंबई : (स. गांवकरी)**

सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुधारित निवृत्ती वेतन योजनेसह १८ मागण्यांवर कोणताही तोडगा न निघाल्याने उद्या सलग चौथ्या दिवशी हा संप कायम राहणार आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला मात्र बैठकीचे इतिवृत्त अद्यापपर्यंत कर्मचारी संघटनांना देण्यात आलेले नाही. सुधारित पेन्शन योजनेबाबतही कोणताच ठोस निर्णय झालेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडूनच मागण्यांबाबत योग्य भूमिका जाहीर करण्यात यावी, अशी भूमिका कर्मचारी संघटनेकडून घेण्यात आली आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांचा संप २१ एप्रिलपासून सुरू झाला असून २२ एप्रिल रोजी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीला मुख्य सचिवांकडून चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांच्या १८ प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सकारात्मक प्रतिसाद दर्शविल्यानंतरही कोणताही ठोस निर्णय सरकारकडून जाहीर करण्यात आला नाही.

त्याचप्रमाणे या बैठकीचे इतिवृत्तही संघटनांना देण्यात आले नाही. सुधारित निवृत्ती वेतन योजनेबाबतही कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यास्तरावर अधिकृत बैठक झाल्याशिवाय ठोस निर्णय होऊ शकणार नाही का, असा सवाल कर्मचारी समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी केला.

मागील १५ महिने लक्षवेधी आंदोलन करून शासनाकडून विनम्रपणे योग्य निर्णयाची अपेक्षा केली; परंतु सरकारने आजपर्यंत दुजाभाव दाखवला आहे. कर्मचाऱ्यांचा संप आंदोलनाला पूर्ण पाठिंबा असून शिक्षकही मोठ्या प्रमाणात संपात उतरले असल्याचा दावा कमर्चारी संघटनेकडून करण्यात आला आहे. मागील तीन दिवस संप आंदोलनाद्वारे न्यायाची अपेक्षा करीत असताना सरकारकडून योग्य प्रतिसाद दिला जात नसल्याने उद्या शुक्रवारी सलग चौथ्या दिवशी संप सुरूच ठेवण्याचा निर्णय समन्वय समितीच्या सुकाणू समितीच्या झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

### महसुलावर होणार परिणाम

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे राज्याच्या महसुलावर परिणाम होत आहे. विवाह नोंदणी कार्यालयापासून मुद्रांक शुल्क विभागाचे कामकाज ठप्प होण्याची वेळ आली आहे. संपावर कोणताही तोडगा काढण्याच्या संदर्भात शासकीय पातळीवर आज कोणतीही बैठक झाली नाही. जिल्हाधिकारी कार्यालये, कोषागार(ट्रेझरी), कार्यालये, वस्तू व सेवा कर, आरटीओ, पाटबंधारे, कृषी विभाग कार्यालये, अनुदानित महाविद्यालये व शाळांवर संपाचा थेट परिणाम जाणवू लागला आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'नरक' पोस्टवर भारताची तीव्र प्रतिक्रिया

**------ : (स. गांवकरी)**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचा उल्लेख 'नरक' असा करणारी एक पोस्ट केल्यानंतर गुरूवारी भारताने या विधानावर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले आहेत. अशी विधाने ही अपुऱ्या माहितीवर अधारित आणि अयोग्य असल्याचे भारताने म्हटले आहे. इतकेच नाही ही विधाने अमेरिका आणि भारत यांच्यातील द्विपक्षीय संबंधांचे खरे स्वरूप दर्शवत नाहीत, असेही भारताने म्हटले आहे. माध्यमांकडून विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, भारताकडून सोशल मीडियावरील मूळ विधान आणि अमेरिकन दूतावासाने जारी केलेले स्पष्टीकरण या दोन्हीची दखल घेण्यात आली आहे. "आम्ही ते विधाने आणि त्या संदर्भात अमेरिकन दूतावासाने जारी केलेले स्पष्टीकरण पाहिले आहे. ही विधाने निश्चितपणे अपुऱ्या माहितीवर आधारित, अयोग्य आणि आक्षेपार्ह आहेत. दीर्घकाळापासून परस्पर आदर आणि सामायिक हित यावर आधारित भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधांचे वास्तव ती नक्कीच दर्शवत नाहीत," असे जयस्वाल म्हणाले. अमेरिकेतील जन्मजात नागरिकत्वाच्या कायद्यावर टीका करताना कन्झर्व्हेटिव्ह रेडिओ होस्ट मायकल सॅव्हेज यांनी भारत आणि चीनचा उल्लेख 'नरक' (हेलहोल) असा केला होता. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर सॅव्हेज यांचा हा व्हिडीओ आणि त्याची ट्रान्सक्रिप्ट रीपोस्ट केली. यानंतर वादाला तोंड फुटल्याचे पाहायला मिळाले. सॅव्हेज नेशन पॉडकास्टमध्ये सॅव्हेज यांनी नादगरिकत्व कायद्यावर टीका केली. या कायद्यामुळे अमेरिकेच्या भूमीवर जन्मलेल्या बहुतेक मुलांना नागरिकत्व दिले जाते, मग त्यांच्या पालकांकडे अधिकृत कागदपत्रे नसली किंवा ते देशात तात्पुरते वास्तव्यास असले तरीही त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळते. भारत आणि चीनसारख्या देशांतील स्थलांतरित या धोरणाचा गैरफायदा घेत असल्याचा दावा त्यांनी केला.



# थोडक्यात पण महत्वाचे



## रामभाऊ जांभळे यांचा सेवानिवृत्ती सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

श्रीगोंदा (स. गांवकरी) : नूतन मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेडगाव येथून सेवेतून सेवानिवृत्त झाल्याबद्दल ज्येष्ठ शिक्षक रामभाऊ जांभळे यांचा सत्कार समारंभ सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सूर्यवंशी सर होते. आपल्या सेवाकाळात जांभळे सरांनी वक्तशीरपणा, शिस्त, प्रामाणिकपणा आणि कामाप्रती निष्ठा या मूल्यांचे सातत्याने पालन केले. त्यांच्या या गुणांमुळे त्यांनी विद्यार्थी, सहकारी आणि ग्रामस्थांमध्ये आदराचे स्थान निर्माण केले. समारंभात शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी जांभळे सरांबद्दल आपली मनोगते व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच ग्रामस्थांनीही त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शाळेच्या उभारणीपासून ते विकासापर्यंत जांभळे सरांचे मोलाचे योगदान असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या प्रसंगी लक्ष्मण रसाळ, भीमराव बेलेकर, किसन बेलेकर, विजय रसाळ, शाहूराज भोपळे, देविदास रसाळ, आप्पासाहेब भोसले, मोहन शेळके, अजित शेळके, चैत्राली शेळके-जांभळे, तुकाई देवी ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, शंकर मांडगे, भगवान चव्हाण, आशा चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच ग्रामस्थ, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## संत महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : उदापुर ता:-जुन्नर येथे श्री संत महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त समस्त लिंगायत समाजा च्या वतीने जेष्ठ चित्रकलाशिक्षक रमाकांत वाळेकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. महात्मा बसवेश्वर यांनी मानवता हा एकच धर्म असल्याचे सांगितले.कुठलाही जातीभेद न करता मानव हा जगातील एकमेव श्रेष्ठ धर्म आहे.प्रत्येकाने समाजात वावरतानाआपापसात मान सन्मानाने,प्रेमाने व माणुसकीने वागल्यास निश्चितच देशासह जगभरात शांतता प्रस्थापित होईल असे संतोष होनराव यांनी सांगितले. यावेळेस माजी उपसरपंच रामदास वल्व्हणकर,भानुदास वाळेकर,धनंजय ढमढेरे,संतोष ढमढेरे,अवधूत बेदरे,रेवणनाथ वल्व्हणकर,श्लोक होनराव उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार माजी ग्रामपंचायत सदस्य मोहन वल्व्हणकर यांनी मानले.

## ठाण्यात सर्व्हिस सेंटरमध्ये वाहन धुण्यावर 10 जूनपर्यंत निर्बंध

ठाणे (स. गांवकरी) : शहरातील वाढत्या उष्णतेमुळे पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि आयुक्त सौरभ राव यांनी नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन केले आहे. पाणीटंचाई टाळण्यासाठी शहरातील सर्व सर्व्हिस सेंटरमध्ये वाहन धुणे व इतर साफसफाईच्या कामांवर 10 जून 2026 पर्यंत निर्बंध घालण्यात आले असून नागरिकांनी याबाबत सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या तीव्र उन्हामुळे धरणांतील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. तसेच शहरातील विहिरी व कूपनलिकांची पाणीपातळीही खालावली आहे. या परिस्थितीत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी केले आहे. पाणी बचतीसाठी प्रभावी उपाययोजना म्हणून सर्व्हिस सेंटरमध्ये दोन, तीन व चार चाकी वाहनांसह इतर वाहनांचे धुणे आणि साफसफाई तात्पुरती बंद करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या आहे. याशिवाय, सर्व व्यावसायिक आस्थापनांनी पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा, पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा आणि नियमांचे काटेकोर पालन करावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. घरगुती पातळीवरही पाणी बचतीच्या सवयी अंगीकाराव्यात. गाड्या धुणे, अंगण धुणे, नळ सुरू ठेवणे अशा पाणी वाया जाणाऱ्या सवयी टाळाव्यात असेही महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले आहे.

## जीआयआयएस स्कूल हडपसरची २०२६ निकालांत आश्वासक कामगिरी

पुणे (स. गांवकरी) : ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयसी), हडपसरच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बोर्डाच्या इयत्ता १० वीच्या ताज्या निकालात सातत्यपूर्ण शैक्षणिक कामगिरी बजावली असून बोर्डात ९८.७९% गुणांची अव्वल कमाई केली आहे. तसेच ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस) हडपसरच्या एकूण ५३.०१% विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले असून जागतिक दर्जाच्या शिक्षणासाठी उत्कृष्ट संस्था म्हणून शाळेला प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. या बॅचमधील अनन्या राजोळ (९८.६०%) अव्वल असून दुसऱ्या क्रमांकावर इशिता झिंजाडे (९८.४०%), तिसऱ्या क्रमांकावर भुवी नीलेश बोंडे, श्रीश सतीश कुमार, तनिरिका बन्सल (९७.६०%) चमकले आहेत.

# पत्रकारिता, सामाजिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा!

## भोपाळ राजभवनात राज्यपाल मंगुभाई पटेल यांची डॉ. विश्वासराव आरोटे यांनी घेतली सदिच्छा भेट





भोपाळ : (स. गांवकरी)

मध्यप्रदेश राज्याच्या राज्यपाल श्री मंगुभाई पटेल यांची भोपाळ येथील राजभवनात दैनिक समर्थ गांवकरी व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रतिनिधीमंडळाने सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान पत्रकारिता क्षेत्रातील बदलते स्वरूप, ग्रामीण भागातील पत्रकारितेची आव्हाने, सामाजिक प्रश्न आणि लोकहिताच्या विविध विषयांवर सखोल व सकारात्मक चर्चा झाली.

प्रतिनिधी मंडळाने राज्यपालांना संघटनेच्या कार्याची माहिती देत पत्रकारांच्या हक्कांबाबत, डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावाबाबत तसेच समाजहिताच्या उपक्रमांबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी राज्यपाल मंगुभाई पटेल यांनी पत्रकारितेची जबाबदारी अधोरेखित करत समाजाच्या जडणघडणीत माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी राज्यपालांना गीता सार ही पुस्तिका भेट देऊन भारतीय संस्कृती व मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. तसेच, अखिल भारतीय गुजरात समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून संजय पटेल यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा यावेळी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव उपस्थितांनी केला.

या भेटीला दैनिक समर्थ गांवकरीचे समूह संपादक शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), राम जानकी मंदिराचे पीठाधीश्वर जगनजेय महाराज,

जबलपूर येथील नामांकित विधी तज्ञ ॲड अरुण भाई चौधरी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात आदरयुक्त व सकारात्मक वातावरण होते. ही भेट पत्रकार संघाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली असून भविष्यातही अशा संवादातून समाजहिताचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, असा विश्वास प्रतिनिधींनी व्यक्त केला.

# प्रशासनाच्या आश्वासनानंतर शिर्डीतील उपोषण स्थगित!

शिर्डी : (स. गांवकरी)

शिर्डी येथे सुरू असलेले उपोषण प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर अखेर स्थगित करण्यात आले. नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी यांच्या मध्यस्थीने झालेल्या चर्चेनंतर आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांवर कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाने ३० दिवसांची मुदत देत एक महिन्यात ठोस पावले उचलण्याचे लेखी आश्वासन दिले. हे आश्वासनपत्र छावा संघटनेचे जिल्हाप्रमुख अविनाश शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या निर्णयानंतर आंदोलनकर्त्यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. या प्रसंगी छावा क्रांतिवीर सेनेचे जालिंदर बाबा असणे, संदीप वाघ, अनिल मलदोडे, उद्धव कटारे, दीपक पाटील, प्रदीप कोते, कुणाल धिवर, मंगेश शिंदे, आदेश पांगरकर, दीपक जाधव यांच्यासह प्रहार जनशक्ती पक्षाचे सचिन आरणे तसेच शिवसेना (उद्धव



बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नानकजी सावंत, मनोज जाधव, भागिनाथ जाधव, सुशांत कुडदे, शाहू रोकडे, अविनाश ससाने आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलनकर्त्यांनी तात्पुरते आंदोलन मागे घेतले असले, तरी दिलेल्या मुदतीत ठोस कारवाई न झाल्यास आंदोलन पुन्हा तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# स्पर्धा परिक्षेत यश मिळविता येत : ज्ञानेश्वरी पवार

वैजापूर : (स. गांवकरी)

आपल्या जवळ जिद्द आणि अभ्यास करण्याची तयारी असेल तर स्पर्धा परिक्षा काही अवघड नाहीत ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊनही आपण स्पर्धा परिक्षेत यश मिळवू शकतो असे मार्गदर्शन नुकत्याच लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धेतून कर संहायक व महसुल सहायक पदांवर निवड झालेल्या ज्ञानेश्वरी पवार हिने विद्याध्यर्थ्यांना केले. अंचलगाव (ताः वैजापुर) येथील जिल्हा परिषद प्रशालेत विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न झाला त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी शालेय समितीचे अध्यक्ष ज्ञनिश्वर जाधव हे होते. तर मुख्याध्यापक एम . बी गोसावी,उपाध्यक्ष बाबु सुराशे, सदस्य योगेश गायके, सोमनाथ कोकाटे, अनिता निकम, प्रकाश नन्नावरे, संदिप कंकाळ मुख्याध्यापक बी. के. जाधव मुख्याध्यापक महाले सरे, कांबळे सर, नामदेव पवार, सरपंच मच्छीद्र आबा गायके यांची




व्यासपीठावर प्रमुय उपस्थिती होती. याप्रसंगी ज्ञानेश्वरी पवार सादिया संय्यद, संदेश कोकाटे, आदेश कोकाटे, केंद्रीय प्रमुख सुनिल गंगवाल यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कु. ज्ञानेश्वरी पवार म्हणाली की, ग्रामीण भागातील विद्याध्यांमध्ये स्पर्धा परिक्षेविषयी खुप भिती असते परंतु जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेऊन आपल्या आई-वडीलोनी आपल्यासाठी ती एक संधी दिलेली असते त्या संधीचे सोने केले पाहिजे प्रथम आपले ध्येय निश्चीत होणे गरजेचे असते तेव्हाच आपल्याला दिशा मिळत असते.

मार्ग सापडत असतो. आपल्या आई-वडीलांच्या कष्टाची जाणीव ठेऊन जर शिक्षण घेतले तर यश नक्कीच मिळले. ग्रामीण भागातील शाळाही दर्जेदार आहेत परंतु लोकांचा कल इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे बघायला मिळतो. खरी गुणवत्ता हि जिल्हा परिषदेच्या शाळेमध्येच बघायला मिळते. मी देखिल मराठी शाळेत शिकूनच हे यश संपादन केले आहे. जिद्ध आणि चिकाटी याला मेहनतीची जोड देऊन जर अभ्यास केला तर यश जास्त काळ आपल्यापासून दूर राहु शकत नाही असे ज्ञानेश्वरी पवार म्हणाली, याप्रसंगी एनएमएमएस, मंथन एम.टी एस, .ऑलीम्पीयाउ, नवोदय स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्याश्र्याचाही सत्कार करण्यात आला, कार्यक्रम यशस्वीततेसाठी जालीदर कोकाटे, खरातसर, काठे सर, जगताप सर, सविता गायके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुनिल काळे, तेजस्विनी मतकर, चाँद मुंजेवार यांनी केले तर अनिता जगताप यांनी आभार मानले.

त्याप्रसंगी कार्यक्रमास दळे सर, गडगीळे सर, भागवत सर, गायकवाड सर राऊतसर गुंजाळसर, सखी सावित्री मंचच्या अध्यक्ष निर्मला ताई जाधव, छायांलाई भारती, ज्ञानेश्वर गायके यासह अनेकांची उपस्थिती होती.

# हिवरे खुर्द शाळेत शिक्षकांचा कार्यगौरव

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

सोमवार दि:- २० एप्रिल रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,हिवरेखुर्द येथे इयत्ता १ली पहिलीचा शाळा प्रवेशोत्सव, इयत्ता सातवीचा सदिच्छा समारंभ व हिवरे खुर्द शाळेतून बदली झालेल्या शिक्षकांचा कार्यगौरव समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्याअध्यक्ष स्थानी रोहिदास जाधव होते.

कार्यक्रम प्रसंगी जुन्नर गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू धोंडगे,केंद्रप्रमुख,रविंद्र कुटे, सरपंच मनेश बर्डे,उपसरपंच लक्ष्मण वायकर,शिक्षक नेते सत्यवान म्हस्के,न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक मच्छिंद्र भोर,सागर वायकर अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती, उपाध्यक्षा दिपाली जाधव, संतोष शिर्के,अन्वर शेख,वर्षा बर्डे,तारामती वायकर,शितल वाघचौरे,हिना शेख,हिवरे खुर्द गावातील अंगणवाडी सेविका




अलका घोलप,सपना औटी, शैला येंधे,सुवर्णा बेनके वरील सर्व मान्यवरांचा सत्कार शालेय व्यवस्थापन समिती व शाळेच्या वतीने करण्यात आला.तसेच कार्यक्रम प्रसंगी ग्रामस्थ,पालक व गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

इयत्ता पहिलीचा शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.नवीन प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचा फेटा बांधून,शालेय वस्तू,गुलाबपुष्प व खाऊ देऊन साजरा करण्यात आला.तसेच इयत्ता सातवीचा सदिच्छा समारंभ उत्साहात पार पडला.कार्यक्रम प्रसंगी आवनी येंधे,ईशिका वायकर,मानसी वायकर,ईश्वरी जाधव व जिकरा शेख या विद्यार्थीनीनी यांनी आपले शाळेविषयी व मार्गदर्शक शिक्षकांविषयी भावनिक मते व्यक्त केली.इयत्ता सातवी बॅच च्या वतीने शाळेस मुख्याध्यापक कार्यालयासाठी घड्याळ व शिक्षकांसाठी भेट वस्तू देण्यात आल्या.तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,हिवरे खुर्द शाळेतून सुरेखा विजय नवले व सीमा चंद्रकांत जाधव या दोन्ही शिक्षिकांचा ग्रामस्थ,शालेय व्यवस्थापन समिती,पालक, शिक्षक वृंद यांच्या वतीने सन्मानपत्र,शाल व गुलाबपुष्प देवून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.सुरेखा विजय नवले यांनी शाळेबद्दल भावनिक मनोगत व्यक्त केले.तसेच सीमा जाधव यांनी शाळेची वाढत चाललेली प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. तसेच इयत्ता चौथी व पाचवीचा एन.एस.एस.इ.च्या स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश मिळविल्याबद्दल विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक निलेश सरोदे यांचे मान्यवरांनी कौतुक केले.

यावेळी रोहिदास जाधव, लक्ष्मण वायकर,सागर वायकर, मच्छिंद्र भोर,सपना औटी व शिक्षक वृंद यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन विकास मटाले, सुरेखा म्हस्के,वर्षा जाधव यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अन्वर सय्यद मुख्याध्यापक, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश सरोदे यांनी केले व आभार गुणवंतराव इंगळे यांनी मानले.

# डॉ. आंबेडकर जयंती न साजरी केल्याप्रकरणी कारवाई करा

पारनेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील वनकुटे ग्रामपंचायत येथे १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती तसेच संत रविदास जयंती शासकीय नियमानुसार साजरी करण्यात आलेली नाही, असा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर यांच्याकडे लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार संबंधित जयंतीदिनी ग्रामपंचायत स्तरावर सभा घेणे, प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे, स्वच्छता मोहीम राबविणे व जयंती उत्साहात साजरी करणे बंधनकारक आहे. मात्र वनकुटे ग्रामपंचायत येथे या सूचनांचे पालन झाले नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. निवेदनानुसार, जयंतीदिनी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामविकास अधिकारी हे उपस्थित नव्हते. कोणताही अधिकृत कार्यक्रम आयोजित करण्यात आला नाही, ही बाब गंभीर असून ती थोर व्यक्तींचा व शासकीय आदेशांचा अवमान असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले आहे. या प्रकरणी संबंधित पदाधिकारी व अधिकाऱ्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रशासनाने योग्य ती दखल न घेतल्यास सर्व संघटनांना सोबत घेऊन आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या निवेदनावर संतोष बबन केदारी, रोहित गोरक्ष खामकर, बाबासाहेब साळवे, राहुल जाधव, तात्याभाऊ मुसळे, संपत खामकर, पोपट खैरे, अमोल झरेकर, प्रेमराज साळवे, सागर साळवे, सचिन खैरे, मंगेश साळवे, लक्ष्मण हुलावळे, लक्ष्मण मुसळे, गणेश गागरे, प्रशांत औटी, कारभारी खामकर, प्रशांत केदारी, सुरेश गागरे, सुभाष साळवे, हौसाबाई साळवे, दिपक खामकर, सुनील गायकवाड, रविंद्र बर्डे आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जागतिक लिव्हर दिनानिमित्त अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचा जनजागृती उपक्रम

नाशिक : (स. गांवकरी)

जागतिक लिव्हर दिनानिमित्त अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे लिव्हरच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला. यावर्षी "Solid Habits, Strong Liver" या संकल्पनेवर भर देत नागरिकांना निरोगी सवयी अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असलेले चार महत्त्वाचे स्तंभ (Four Solid Habits) अधोरेखित करण्यात आले—संतुलित आहार (Balanced Diet), नियमित शारीरिक हालचाल (Physical Activity), मद्यपानाचे मर्यादित सेवन (Reduced Alcohol Intake) आणि नियमित



आरोग्य तपासणी (Regular Check-ups). तज्ज्ञांनी सांगितले की, या चार सवयींचा अंगीकार केल्यास लिव्हरशी संबंधित अनेक आजार प्रभावीपणे टाळता येऊ शकतात. याबाबत बोलताना गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजिस्ट डॉ. संदीप पाटील म्हणाले, "लिव्हर हा शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव असून तो पचनक्रिया, विषारी घटकांचे निर्मूलन आणि शरीरातील संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि योग्य जीवनशैली यांच्या माध्यमातून लिव्हरची काळजी घेणे अत्यावश्यक आहे."

डॉ. सोहम दोशी यांनी सांगितले, "लिव्हरचे आजार सुरुवातीच्या टप्प्यात बहुतांश वेळा लक्षणांशिवाय वाढतात. त्यामुळे नियमित तपासणी करणे महत्त्वाचे आहे. यासाठी फायब्रोस्कॅन (Fibroscan) ही आधुनिक, नॉन-इनवेसिव्ह तपासणी उपयुक्त ठरते, ज्याद्वारे लिव्हरमधील फॅट आणि फायब्रोसिस अचूकपणे ओळखता येते."

डॉ. अमोल शिंदे यांनी नमूद केले, "आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे फॅटी लिव्हर आणि इतर लिव्हर विकार वाढताना दिसत आहेत. अनियमित आहार, जंक फूड, मद्यपान आणि शारीरिक हालचालींचा अभाव हे त्यामागील मुख्य कारणे आहेत. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि निरोगी सवयी अंगीकारल्यास हे आजार मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतात." यानंतर लिव्हर ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. अमोल जाधव म्हणाले, "लिव्हर सिरोसिस हा गंभीर आजार असून, त्याच्या उशिरा टप्प्यात लिव्हर ट्रान्सप्लांटची आवश्यकता भासू शकते. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे लिव्हर ट्रान्सप्लांटसाठी अत्याधुनिक सुविधा आणि अनुभवी तज्ज्ञांची टीम उपलब्ध आहे, ज्यामुळे रुग्णांना नाशिकमध्येच उच्च दर्जाचे उपचार मिळू शकतात."

वरिष्ठ GI सर्जन डॉ. संदीप सबनीस यांनी सांगितले, "गत काही वर्षांत जीवनशैलीतील बदलांमुळे नॉन-कम्युनिकेबल आजार—विशेषतः फॅटी लिव्हर, लिव्हर सिरोसिस आणि मेटाबॉलिक विकार—यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे लवकर निदान, योग्य उपचार आणि जीवनशैलीतील सुधारणा अत्यंत आवश्यक आहेत."

तज्ज्ञांनी यावेळी हेपॅटायटिस B या लिव्हरला प्रभावित करणाऱ्या संसर्गजन्य आजाराबाबतही जनजागृती केली. हा आजार रक्त किंवा शारीरिक द्रव्यांद्वारे पसरू शकतो. योग्य लसीकरण (Vaccination), सुरक्षित वैद्यकीय पद्धती आणि नियमित तपासणी यांच्या माध्यमातून हेपॅटायटिस B टाळता येऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी बोलताना अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, "जागतिक लिव्हर दिनाच्या निमित्ताने नागरिकांमध्ये लिव्हरच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा आमचा उद्देश आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून लिव्हरशी संबंधित सर्व प्रकारचे उपचार उपलब्ध आहेत. तसेच, आता लिव्हर ट्रान्सप्लांटसारख्या प्रगत शस्त्रक्रियांसाठी मोठ्या शहरात जाण्याची गरज नसून, नाशिकमध्येच या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमची तज्ज्ञ टीम आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान सज्ज आहे." जागतिक लिव्हर दिनानिमित्त नागरिकांनी नियमित तपासणी करून घ्यावी, संतुलित आहार व निरोगी जीवनशैलीचा अवलंब करावा तसेच लसीकरणाद्वारे हेपॅटायटिससारख्या आजारांपासून स्वतःचे संरक्षण करावे, असे आवाहन करण्यात आले. या अनुषंगाने शोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये जागतिक लिव्हर दिनानिमित्त कॉम्प्रिहेन्सिव्ह लिव्हर स्क्रिनिंग पॅकेज अवघ्या ₹२००० मध्ये सुरू करण्यात आले आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी विभागात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली लिव्हर व पचनसंस्थेच्या आजारांचे अचूक निदान व प्रभावी उपचार उपलब्ध आहेत.

# थोडक्यात पण महत्वाचे



## आ. अंतापूरकरांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट

देगलूर (स. गांवकरी) : बिलोली विधानसभेचे विद्यमान आमदार मतदारसंघाच्या सर्वांगिक विकासाठी मुख्यमंत्री यांची घेतली भेट,देगलूर उपजिल्हा रुग्णालयाच्या १०० खाटांच्या श्रेणीवर्धनासाठी आणि नव्या इमारतीच्या बांधकामाकरिता मुख्यमंत्री यांनी भरीव निधी मंजूर केला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अंतापूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मनःपूर्वक आभार व्यक्त केले. या निर्णयामुळे देगलूर तालुक्यासह सीमावर्ती ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना अत्यधूनिक, सुसज्ज आणि दर्जेदार आरोग्य सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. गंभीर आजारांसाठी मोठ्या शहरांकडे धव घेण्याची गरज कमी होऊन रुग्णांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठी बचत होणार आहे. परिणामी, ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला भक्कम बळकटी मिळणार असल्याचे मानले जात आहे. या प्रकल्पासाठी आ. अंतापूरकर यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता. त्या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने स्थानिक पातळीवर समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान, या भेटीदरम्यान देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा झाली. पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आदी क्षेत्रांतील प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी लवकरच निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. देगलूर-बिलोली मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही देत आगामी काळात विकासकामांना अधिक गती व प्राधान्य दिले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## नर्मदाबाई विठोबा काळे यांचे निधन



गणोरे (स. गांवकरी) : गणोरे (ता.अकोले) येथील नर्मदाबाई विठोबा काळे ( वय ९९ ) यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुली, सुन,नातु, पंतु असा मोठा परिवार आहे. कृष्णाबाई हांडे, राधाबाई राऊत, सत्यभामा उगले, राधाबाई ढमाले यांच्या आई तर आदर्श इंग्लीश स्कुल वडगाव लांडगा या शाळेचे जेष्ठ शिक्षक बाबासाहेब हांडे, उमेश, संतोष,प्रकाश,अभिनव,राहुल, महेश व रविंद्र, काळे यांच्या त्या आजी होत. गणोरे येथील स्मशानभूमी मध्ये त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक,राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## कन्हैयालाल महाराज यांचे निधन



रावेर (स. गांवकरी) : खानापूर येथील श्री कन्हैयालाल महाराज ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष तथा रिंगणगाव हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री वामनराव विठोबा चौधरी (वय ८६) यांचे दि २१ एप्रिल रोजी सकाळी ।। वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या दि २२ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता त्यांचे राहते घरापासून निघणार आहे. बंभाडा (ता. बऱ्हाणपूर)येथील डॉ श्रीकांत व्ही चौधरी व रावेर येथील लोकमत तालूका प्रतिनिधी किरण वामनराव चौधरी यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन मुले नातवंडे असा परिवार आहे.

## वनविभागाच्या सतर्कतेमुळे वानराच्या पिल्लाचे वाचले प्राण



बिलोली (स. गांवकरी) : वाढत्या उन्हाळ्यामुळे जंगलांमध्ये नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटल्याने वन्यप्राण्यांची पाण्यासाठी मोठी त्राहीत्राही होत आहे. यामुळे तालुक्यातील विविध भागांत पाणी आणि अन्नाच्या शोधात वानरसेना मानवी वस्त्यांकडे धाव घेतली आहेत. अशात एका वनराचं पिल्लू आंब्याच्या झाडाला सुरक्षेसाठी लावण्यात आलेल्या जाळीत आडकले असता वनविभागाच्या टीमने त्या वानर पिल्लाची जाळीतून सुटका करून प्राण वाचले आहे. उन्हाचा पारा वाढल्याने जिवाची लाहीलाही होत आहे. त्यापासून बचाव व्हावा यासाठी सावलीचे ठिकाण, थंडगार पाणी, टोपी आदींचा वापर करताना नागरिक दिसत आहेत परंतु ऊन, वारा व पावसाची भीती न बाळगता वास्तव्य करत असलेल्या वन्य प्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ग्रामीण भागात वाढत्या तापमानामुळे जमिनीतील पाण्याची पातळी खोलवर गेली असल्याने जलस्रोतही कोरडे पडले आहेत. तालुक्यात मोठ्या प्रमाणात माळरान असलेतरी सद्यस्थीत तालुक्यात फळबागेसह विविध वृक्षाची मोठ्याप्रमाणात कत्तल होत असल्याने या भागातील वन्य प्राण्यांना अन्न,निवारा, पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. यामुळे डोंगराळ भागातून वन्यप्राणी गाव वस्तीवर येऊन पिण्याच्या पाण्याचा शोध घेत आहेत. शेतवस्तीवरील पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने नदी, नाले व सिंचन विहिरी कोरडेठाक पडले आहेत. उन्हाच्या कडाक्याने पानझड व बेसुमार वृक्षाच्या कत्तलीमुळे सावली नसल्याने प्राण्याच्या विश्रांतीचा आश्रयही आता नष्ट झाला असल्याने पाण्याच्या शोधात तहानलेल्या वानर सेनेने जंगल सोडून शहराकडे येण्यास सुरवात केली आहे.

### जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधितांना जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्रीमती आशा दीपक अंबाडेकर , रा. रूम नं. ३०४, मंजुळा अपार्टमेंट, प्लॉट नं. ए-७७, सेक्टर २३, नेरूळ, नवी मुंबई यांनी त्यांच्या पती कै. दीपक वासुदेवराव अंबाडेकर यांच्या मृत्यूची नोंद ठाणे महानगरपालिका यांच्या अभिलेखात करण्यात आलेली नसल्याने, सदर मृत्यू नोंद करण्यासाठी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. भारत सरकार, विधी व न्याय विभाग यांच्या दिनांक ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रानुसार जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मधील कलम ११(२) व ११(३) तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २३(२) अन्वये, जन्म/मृत्यूची नोंद एक वर्षानंतर विलंबाने करण्यासंबंधी आदेश देण्याचा अधिकार या कार्यालयास प्रदान करण्यात आलेला आहे. तरी, कै. दीपक वासुदेवराव अंबाडेकर यांच्या मृत्यूची नोंद करण्याबाबत कोणास काही आक्षेप/हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत, कार्यालयीन वेळेत स्वतः किंवा कायदेशीर प्रतिनिधीसह आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यालयात हजर राहावे. अन्यथा, उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील कार्यवाही करून निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# संघर्षातून साकारलेले स्वप्न आणि वाढदिवसाचा प्रेरणादायी अर्थ

(स. गांवकरी)



एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस हा केवळ वय वाढल्याचा दिवस नसतो, तर तो आयुष्यातील संघर्ष, यश, अपयश, अनुभव आणि जिद्दीचा उत्सव असतो. आशीष मारोतराव घुमे यांचा वाढदिवसही याच अर्थाने विशेष ठरतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजसेवेचा जो ध्यास घेतला, तो प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याची प्रक्रिया नसून ती समाजाचा आरसा असते. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, दुर्बलांना न्याय मिळवून देणे आणि सत्य जनतेसमोर मांडणे हे पत्रकारितेचे खरे ध्येय आहे. हाच ध्यास मनात बाळगून आशीष यांनी आपल्या वाटचालीला सुरुवात केली. सुरुवातीला पोर्टल, नंतर साप्ताहिक सुरू करून त्यांनी आपल्या स्वप्नांना वास्तवात उतरवले.

काम करताना अनेक अडचणी आल्या. आर्थिक अडचणी, स्पर्धा, समाजातील दबाव या सगळ्यांशी सामना करत त्यांनी आपला मार्ग तयार केला. "आपलं स्वतःचं एक हक्काचं वर्तमानपत्र असावं" ही भावना त्यांच्या मनात दृढ झाली आणि त्यातूनच 'सह्याद्रीचा राखणदार'चा जन्म झाला. आज हे दैनिक केवळ एक वृत्तपत्र नसून अनेकांच्या आशा-आकांक्षांचे व्यासपीठ बनले आहे.

या दैनिकाच्या माध्यमातून अनेक कर्तबगार व्यक्तिमत्त्वांचे कार्य समाजापर्यंत पोहोचवले गेले. विशेष पुरवण्या, सामाजिक विषयांवरील लेख आणि सत्याधारित बातम्या यामुळे हे दैनिक वाचकांच्या मनात घर निर्माण करण्यात यशस्वी झाले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले. यशाच्या या प्रवासात त्यांनी केवळ स्वतःचीच प्रगती केली नाही, तर नवीन वार्ताहर आणि लेखक घडवण्याचेही मोठे काम केले. अनेक नवोदित तरुणांना संधी देत त्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात नव्या पिढीला दिशा मिळाली. दैनिक चालवणे हे सोपे काम नाही. प्रस्थापित दैनिकांच्या स्पर्धेत टिकून राहणे, आर्थिक भार सहन करणे आणि तरीही गुणवत्ता टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान असते. मात्र आशीष यांनी पदरमोड करून, प्रचंड मेहनत घेत हे दैनिक जिवंत ठेवले. आज हे दैनिक ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही माध्यमांतून यशस्वीपणे चालत आहे. या प्रवासात त्यांच्या आयुष्यात एक मोठा वळण आले, जीवघेणा आजार जडला. अनेक ठिकाणी उपचार करूनही निराशा पदरी पडली. डॉक्टरांनीही आशा सोडली होती. पण म्हणतात ना, "जिथे इच्छा तिथे मार्ग." त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीने आणि अथक प्रयत्नांनी त्यांनी मृत्यूच्या दारातून परत येत नवजीवन मिळवले. हे केवळ वैद्यकीय चमत्कार नव्हे, तर त्यांच्या जिद्दीचे आणि सकारात्मकतेचे फळ होते. आज त्यांचे वडील मारोतराव नारायणराव घुमे यांच्या मार्गदर्शनाखाली 'सह्याद्रीचा राखणदार'ची घोडदौड सुरू आहे. मुद्रित माध्यम क्षेत्रात त्यांनी आपली एक ठोस प्रतिमा निर्माण केली आहे. समाजहितासाठी कार्य करणारे, सत्यासाठी लढणारे आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख झाली आहे.वाढदिवस हा आत्मपरीक्षणाचा दिवसही असतो. गेल्या वर्षातील अनुभवांचा आढावा घेऊन पुढील वाटचालीचे नियोजन करण्याची ही संधी असते. आशीष यांच्या बाबतीत हा दिवस त्यांच्या संघर्षमय प्रवासाची आठवण करून देणारा आणि पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा देणारा आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा! 'सह्याद्रीचा राखणदार' हे दैनिक दिवसेंदिवस भरभराटीला जावो, अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचो आणि समाजासाठी एक मजबूत आवाज बनो, हीच अपेक्षा. तसेच आशीष यांना निरोगी, निरामय आणि दीर्घायुष्य लाभो, त्यांच्या कार्याला अधिक उंची मिळो हीच मनःपूर्वक शुभेच्छा.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे उल्लेखनीय यश

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस, महावीर पटवा आणि बाळासाहेब महाडिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षीय भाषणात बबनराव पाचपुते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून संघर्षातून पुढे जाणे आवश्यक आहे. जीवनात कष्ट आणि चिकाटी असल्यासच यश मिळते. मोठे होण्याचे स्वप्न पाहा आणि प्रत्येक संधीचे सोने करा."यावेळी बाबासाहेब




भोसले यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून सांगितले की, "प्रतिकूल परिस्थितीतूनच खरे यश मिळते. सातत्यपूर्ण परिश्रमांमुळेच विद्यार्थी उच्च स्थान गाठू शकतात." महाविद्यालयाची यशस्वी परंपरा भविष्यातही कायम राहील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. समारंभात विविध क्षेत्रांत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र पोलीस दलात प्रगती मुसळे, प्रियंका दरवडे, यशोदा म्हस्के, निशांत एकमले, अश्विनी हिरडे, मनीषा कापसे, सावरी खडके, स्वप्निल चौधरी, क्रांती रसाळ आणि फुलाबाई पवार यांची निवड झाली आहे.

## यात्रा मोठ्या उत्साहात : यात्रेत ३५० बैलगाडे धावले

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

ग्रामीण भागात सध्या यात्रांचा हंगाम सुरू असून अंतिम टप्प्यातील यात्रा मोठ्या गावांमध्ये उत्साहात पार पडत आहेत. तालुक्याचे प्रमुख ठिकाण असलेल्या राजगुरुनगर येथे श्री भोपळबुवा महाराज व श्री सिद्धेश्वर महाराज यांची यात्रा तीन दिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यती, लोकनाट्य तमाशा आणि कुस्ती स्पर्धा ही प्रमुख आकर्षणे ठरली. यात्रेची सुरुवात मांडव डहाळे व शोभायात्रेने करण्यात आली. यात्रेमुळे परिसरात पाळणे, खेळणी व खाद्यपदार्थांच्या दुकानांनी रंगत वाढली होती. दोन दिवस चाललेल्या बैलगाडा शर्यतीत तब्बल ३५० बैलगाड्यांनी सहभाग घेतला. या शर्यती पाहण्यासाठी शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. विजेत्यांसाठी रोख रक्कम व वस्तुरूप बक्षिसे ठेवण्यात आली होती. दोन दिवस चाललेल्या बैलगाडा शर्यतीत एकूण ३५० बैलगाडा शर्यतीत सहभाग



नोंदविला शर्यतीसाठी आयोजकांकडून क्रमाक्रमाने मोठी रक्कम तसेच वस्तू स्वरूपात बक्षीस ठेवण्यात आली होती. यावेळी यात्रा कमिटी अध्यक्ष नरेंद्र थिगळे , जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर, ज्येष्ठ नेते नानासाहेब टाकळकर, जिल्हा परिषदेचे गटनेते आणि बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, माजी सभापती विनायक घुमटकर, संचालक अशोक राक्षे, सुधीर भोमाळे, पंचायत समितीचे उपसभापती मंगेश सावंत, राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, राजगुरुनगरचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ व नगरसेवक, रेवणनाथ थिगळे, खंडेराव थिगळे, समीर आहेर, अशोक दुगड,अॅड. संदीप भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

रात्री पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा तमाशा ने नागरिकांचे मनोरंजन केले. अखेरच्या दिवशी येथील मामासाहेब मोहोळ कुस्ती मैदानात कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तालुक्यातील नामांकित कुस्तीपटूच्या या आखाड्यात निमंत्रित कुस्त्या झाल्याने संयोजकांनी तालुक्यातील पैलवानांना एक मोठे व्यासपीठ निर्माण करून दिले. यात्रे निमित्ताने झालेल्या कुस्त्यांच्या आखाड्यात ११० पुरुष आणि१० महिला पैलवान यांनी भाग घेतला. निकाली कुस्ती जय हनुमान तालीम सोलापूरच्या शाहरुख खान याने पुण्याच्या काका पवार तालीमीतील रामा कांबळे यांच्यावर मात करीत कुस्ती चितपट करून "राजगुरू मानाची गदा" हा 'किताब जिंकला. आखाड्यात विजेत्या पैलवानासाठी एक हजार रुपयांपासून दीड लाखांपर्यंत इनाम ठेवण्यात आले होते. कुस्ती आखाड्याचे उदघाटन जेष्ठ ग्रामस्थ नानासाहेब टाकळकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख, यात्रा कमिटीचे अध्यक्ष हिरामण सातकर यांच्या हस्ते झाले यावेळी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, नगरसेवक मित्रसेन डोंगरे, फैज मोमीन, वस्ताद मुन्ना शेख, दिलीप मेदगे, संदीप वाडेकर, राहुल पिंगळे, राहुल आढारी, खंडू थिगळे, नरेंद्र थिगळे, गणेश थिगळे,बापू थिटे महाराष्ट्र कुस्ती चॅम्पियन अरुण खेंगले,खेड केसरी शुभम कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अखंड हरिनाम सप्ताहास धर्म ध्वजारोहणाने प्रारंभ



नेवासा : (स. गांवकरी)

श्री सदगुरु ब्रम्हलिन नारायणगिरीजी महाराज यांच्या स्मृती प्रित्यर्थ नेवासा बुद्रुक शिवारातील सुरेगाव रस्त्यावर गुरुवर्य वाणीभूषण महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांनी स्थापित केलेल्या सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमामध्ये मंगळवार दि.२१ एप्रिल रोजी संत महंतांच्या उपस्थितीत व वेदमंत्राच्या जयघोष करत सकाळी धर्म ध्वजारोहण करून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला.दि.२८ एप्रिल पर्यंत हा सोहळा चालणार आहे.सोहळयाचे हे ११ वे वर्षे आहे. यावेळी झालेल्या धर्म ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी सोहळयाचे प्रमुख मार्गदर्शक महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर,श्रीराम साधना आश्रमाचे महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज,त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज,मध्यमेश्वर देवस्थानचे महंत श्री ऋषिनाथजी महाराज,हभप विश्वनाथ महाराज मंडलिक, बहिरा जातवेद संस्थानचे महंत बालब्रम्हचारी श्री विश्वनाथजी महाराज,संत तुकाराम महाराज देवस्थानचे विश्वस्त भागवत कथाकार अंकुश महाराज जगताप यांच्या हस्ते कलश पूजन,ग्रंथ पूजन,सदगुरू नारायणगिरी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन वेदमंत्राच्या जयघोषात करण्यात आले.वेदशास्त्रसंपन्न युवा पुरोहित निखिलगुरू जोशी यांनी धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य केले.

यावेळी सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी संत महंतांचे स्वागत व संतपूजन गुरुवर्य श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या हस्ते करण्यात आले.उपस्थित संत महंतांनी अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाला आपल्या भाषणातून शुभाशीर्वाद दिले.यावेळी सोहळयानिमित्ताने नेवासा बुद्रुक येथून आलेल्या पायी दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी झालेल्या अखंड हरिनाम सप्ताह शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी पारायण व्यासपीठ प्रमुख रामनाथ महाराज पवार,अशोक महाराज निरफळ, कोंडीराम महाराज पेचे,काकासाहेब शिंदे,शंकरराव लोखंडे,उदयकुमार बल्लाळ, जयवंत देवचक्के, माजी सरपंच अण्णाभाऊ पेचे, प्रकाश सोनटक्के, भानुदास रेडे, इंजिनिअर सुनीलराव वाघ, सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ, नामदेवराव शिंदे,ग्रामविकास अधिकारी ज्ञानदेव शिंदे,प्रा.रमेश शिंदे, अण्णासाहेब पटारे, योगेश म्हस्के यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतसेवक बाळासाहेब झिने सर यांनी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक यांनी उपस्थित संत मंडळींसह भाविकांचे आभार मानले. सलग आठ दिवस चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा भजन,सकाळी ७ वाजता स्तोत्रपठण व श्रींची आरती, सकाळी ८ ते १२ श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १२ ते २ भोजनप्रसाद, दुपारी ४ ते ५ प्रवचन,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ यावेळेत होणाऱ्या कीर्तन महोत्सवात नामवंत महाराज मंडळींची किर्तन तदनंतर महाप्रसाद असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे.

## महसूल कर्मचारी संपावर गेल्यामुळे शेतकरी व नागरिकांना त्रास

शिवनेरी : (स. गांवकरी)




जुन्नर तालुका मधील ग्राम महसूल / तलाठी अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय मधील सर्व कर्मचारी मंगळवार, दिनांक २१ रोजी संपावर गेल्यामुळे तालुक्यातील सर्व शेतकरी व नागरिकांना खूपच त्रास सहन करावा लागला आहे. यामुळे शेतकरी, नागरिकांना विवाह नोंदणी, विद्यार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले, सातबारा व आठ, फेरफार, श्रावण बाळ योजना, रजिस्टर ऑफिस, पुरवठा विभाग, रेशनिंग कार्ड ऑफिस, निराधार योजना, तहसील कार्यालय, महसूल कार्यालय, संजय गांधी निराधार योजना ऑफिस, निवडणूक कार्यालय, सर्व कार्यालयातील कर्मचारी संपावर गेल्यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागले आहे . महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना जुन्नर तालुका यांनी पुकारलेल्या बेमुदत संप मध्ये नायब तहसीलदार, सहाय्यक महसूल अधिकारी, महसूल सहाय्यक, वाहन चालक, शिपाई संवार्गातील सर्व कर्मचारी सहभागी झालेले आहेत . याबाबत महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना जुन्नर तालुका यांनी बेमुदत संपाबाबत तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांना निवेदन अनिल थोरवडे, अर्चना मुपडे, अनिल महाजन, आशा निकम, रामदास डामसे, मनीषा बाराथे, आशा काठे ,ए बी गवारी, डी मडके, आर सी रावते, जगदीश खेडकर व इतर कर्मचाऱ्यांनी निवेदनावर सह्या करून दिले आहेत.

# वारकरी संप्रदायावरील टीका हिंदू समाजात फूट पाडण्याचे षडयंत्र

- विहिंपचे केंद्रीय मंत्री शंकरजी गायकर यांचा घणाघात!
- शंकरजी गायकर यांचा इशारा; विश्व हिंदू परिषदेकडून गावंडे यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध!
- शंकरजी गायकर पुढे सरसावले; विश्व हिंदू परिषदेकडून वारकरी संप्रदायाच्या बाजूने ठाम भूमिका!

(स. गांवकरी)



राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे प्रवक्ते विकास गावंडे यांनी वारकरी संप्रदायातील संतांवर केलेल्या टीकेचा विश्व हिंदू परिषदेने तीव्र शब्दांत निषेध केला आहे. विहिंपचे केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय प्रवक्ते श्री. शंकरजी गायकर यांनी गावंडे यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना, "स्वतःचे बेगडी पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी संतांवर चिखलफेक करणाऱ्यांनी आधी आपली पात्रता तपासावी," अशा शब्दांत सुनावले आहे.

"सध्या महाराष्ट्रात हिंदू संमेलनांच्या माध्यमातून सकल हिंदू समाज एकत्र येत आहे. 'हिंदू सारा एक' हा जयघोष विरोधकांच्या पचनी पडत नाहीये, म्हणूनच हिंदू समाजात फूट पाडण्यासाठी वारकरी संप्रदायाला लक्ष्य केले जात आहे."

— शंकरजी गायकर

शंकरजी गायकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे म्हटले आहे की, वारकरी संप्रदाय हा मुळातच सर्वसमावेशक आणि सामाजिक समरसतेचा पुरस्कार करणारा संप्रदाय आहे. "ज्यांनी केवळ नास्तिकतेचा आणि निधर्मीपणाचा बुरखा ओढला आहे, त्यांना वारकरी संप्रदायावर बोलण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. संतांनी गोसेवा, व्यसनमुक्ती आणि समरसतेसाठी दिलेले योगदान गावंडे यांच्यासारख्या अभ्यासशून्य व्यक्तींना कधीच समजणार नाही," असेही त्यांनी नमूद केले.

राज्यात सध्या 'खरात' प्रकरण तसेच नाशिक, परतवाडा आणि अमरावती येथे जिहादी मानसिकतेतून झालेली लैंगिक शोषणाची प्रकरणे समोर आली आहेत. या गंभीर विषयांवरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठीच जाणीवपूर्वक संतांवर आरोप केले जात असल्याचा दावा गायकर यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत वारकरी संप्रदायातील 'टक्केवारी'वर भाष्य केले होते. त्यावर उपरोधिक टोला लगावत गायकर म्हणाले की, "पवार साहेबांच्या त्या विधानामुळेच आज सर्व संप्रदायातील संत एकत्र येत आहेत आणि हिंदू म्हणून उभे राहत आहेत, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो."

विकास गावंडे यांना अशा प्रकारची वक्तव्ये करण्यासाठी रसद कुठून मिळते? त्यांच्या मागे नेमकी कोणती आर्थिक शक्ती उभी आहे? याचा शोध प्रशासनाने तातडीने घ्यावा, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेने केली आहे. महाराष्ट्रातील शांतता आणि विकासाचे वातावरण बिघडवण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# ‘जीवनगौरव पुरस्काराने’ डॉ. भगवान झंवर यांचा गौरव

मेहकर : (स. गांवकरी)

IMA मेहकर आणि MHCON मेहकर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘सिनर्जी इन क्लिनिकल प्रॅक्टिस’ (MHCON 2026) या वैज्ञानिक कार्यक्रमात ज्येष्ठ व समर्पित चिकित्सक डॉ. भगवान झंवर यांना प्रतिष्ठेचा ‘जीवनगौरव पुरस्कार’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा भव्य सोहळा मेहकर येथील डॉ. भगवान झंवर आयएमए हॉलमध्ये पार पडला.

केंद्रीय आयुष व कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार डॉ. झंवर यांना



त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील आणि सामाजिक कार्यातील उल्लेखनीय, दीर्घकालीन योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला.

यावेळी IMA मेहकरचे अध्यक्ष डॉ. विनय साओजी यांनी डॉ. झंवर यांच्या कार्याचा आढावा घेत सांगितले की, त्यांनी १९८० साली शासकीय सेवेत प्रवेश केला आणि कोणतीही बदली न होता तब्बल ३२ वर्षे मेहकर येथे वैद्यकीय अधिकारी व अधीक्षक म्हणून सेवा बजावली. त्यांच्या सेवाकाळात त्यांनी भाजलेल्या रुग्णांचे उपचार, विषबाधा तसेच इतर गुंतागुंतीच्या आपत्कालीन प्रकरणांचे यशस्वी व्यवस्थापन केले.

तसेच त्यांनी सुमारे १४,००० कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया (ट्युबेक्टोमी) यशस्वीरीत्या केल्या. पोस्टमॉर्टम केंद्रांची कमतरता असताना सहा पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत येणाऱ्या शवविच्छेदन व कायदेशीर वैद्यकीय जबाबदाऱ्या त्यांनी सक्षमपणे पार पाडल्या.

वैद्यकीय सेवेबरोबरच डॉ. झंवर यांनी विविध सामाजिक उपक्रमांतही सक्रिय सहभाग नोंदवला आहे. निर्मल बहुउद्देशीय संस्था यांसारख्या संस्थांद्वारे त्यांनी आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे व समाजकल्याणाचे उपक्रम राबवले. सध्या ते आपल्या सुपुत्र डॉ. अभिनव झंवर (मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट) यांच्यासोबत कॅन्सर जनजागृती मोहिमेत कार्यरत आहेत. यावेळी मंत्री श्री जाधव यांनी डॉ. झंवर यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात स्वागताध्यक्ष डॉ. संतोष गावंडे, सचिव डॉ. सुभाष खुराड, कोषाध्यक्ष डॉ. श्रीकांत राठोड यांच्यासह IMA मेहकर शाखेच्या सर्व सदस्यांचे योगदान लाभले.



ठाणे : प्रादेशिक मनोरुग्णालय गट ड कर्मचारी संघटना, ठाणे कडून आपल्या अनेक मागण्यासाठी २१ एप्रिल पासून बेमुदत संपामध्ये कर्मचारी वर्ग सामील झाले आहे. जुन्या पेन्शन योजना अंमलबजावणी, रिक्त पदे भरणे, निवृत्ती वय ६० करणे तसेच कंत्राटी सेवा नियमित व कायम करणे आदी मागण्यासाठी आज आंदोलन करण्यात आले. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### घोटी-शिळवंडी येथे महिलांचा संताप; दारू वाहतूक करणारी गाडी पेटवली!

घोटी-शिळवंडी (स. गांवकरी) : घोटी-शिळवंडी परिसरात आज महिलांचा तीव्र संताप उसळल्याची घटना घडली. दारूची अवैध वाहतूक करणारी गाडी महिलांनी अडवून संबंधित विक्रेत्याला मारहाण केली तसेच गाडी पेटवून दिली. मिळालेल्या माहितीनुसार, परिसरात सुरू असलेल्या दारू विक्री व वाहतुकीमुळे त्रस्त झालेल्या महिलांनी एकत्र येत ही कारवाई केली. यावेळी महिलांनी आक्रमक भूमिका घेत गाडीतील दारूची वाहतूक थांबवली आणि संतापाच्या भरात वाहन जाळून टाकले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. महिलांचे हे कृत्य कायद्याच्या दृष्टीने समर्थनीय नसले, तरी तालुक्यातील महिलांमध्ये दारूविरोधात प्रचंड नाराजी आणि संताप आहे, हे या घटनेवरून स्पष्ट होत आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

### जीआयआयएस बालेवाडीच्या शाळेच्या दहावीच्या विद्यार्थ्यांची कामगिरी

पुणे (स. गांवकरी) : ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस) बालेवाडीच्या विद्यार्थ्यांनी अलीकडेच जाहीर झालेल्या इयत्ता १० वीच्या परीक्षेत दिमाखदार कामगिरी केली असून दहावीच्या एकंदर ९८.००% विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी पटकावली आहे. विशेष म्हणजे, जीआयआयएस बालेवाडीच्या एकूण विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४८.५०% गुणवंतांनी ९०% पेक्षा अधिक गुणांची कमाई केली आहे. दहाव्या इयत्तेत वंशित कुमारने ९८.४० टक्के गुण मिळवून पहिला, निमिषा दुबेने ९८.०० टक्के गुण मिळवून दुसरा तर ऋषभ कश्यपने ९७.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला. “ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस), बालेवाडीच्या उत्कृष्ट बोर्ड निकालांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमाचे हे फळ आहे, असे ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल, बालेवाडीच्या मुख्याध्यापिका मुनमुन चक्रवर्ती म्हणाल्या.



### खडकवाडी वीज केंद्रावर शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन; शेतकरी आक्रमक

पारनेर (स. गांवकरी) : तालुक्यातील पळशी, वनकुटे आणि खडकवाडी परिसरात विजेचा लपंडाव आणि कमी दाबाने होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी हवालदिल झाले असून, या समस्येविरोधात संताप व्यक्त करण्यासाठी खडकवाडी येथील वीज उपकेंद्रावर शेतकऱ्यांनी तीव्र ठिय्या आंदोलन केले. गेल्या अनेक दिवसांपासून या भागात वीजपुरवठा पूर्ण दाबाने होत नसल्याने आणि लोडशेडिंगचे प्रमाण अनपेक्षितपणे वाढल्याने उभी पिके डोळ्यादेखत जळू लागली आहेत. विशेषतः लागवड केलेला कांदा, टोमॅटो आणि इतर नगदी पिकांना पाणी देणे अशक्य झाल्याने मोठे आर्थिक नुकसान होत आहे, ज्याचा परिणाम म्हणून शेतकरी वर्गाने आक्रमक पवित्रा घेतला. या आंदोलनाचे नेतृत्व सामाजिक कार्यकर्ते डॉ. नितीन रांधवण आणि पळशी गावचे सरपंच प्रकाश राठोड यांनी केले. या परिसरात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज वास्तव्यास असून त्यांचे संपूर्ण जीवन शेतीवर अवलंबून आहे. मात्र, खडकवाडी वीज केंद्राकडून मिळणाऱ्या अनियमित पुरवठ्यामुळे या कष्टकरी वर्गाचे कंबरडे मोडले आहे. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र ताशेरे ओढले. यावेळी डॉ. नितीन रांधवण, प्रकाश राठोड यांच्यासह बाळासाहेब मुसळे, आप्पासाहेब गागरे, दिपक खामकर, ज्ञानेश्वर गागरे, पवन खामकर, पोपट मेंगाळ, नारायण गागरे, रोहिदास देशमुख, वसंत मुसळे, भास्कर गागरे, अजित वाळुंज, सोमनाथ मुसळे, योगेश शिंदे, गोपीनाथ गुंजाळ, बाबाजी वाबळे, भीमराज मुसळे, विकास डुकरे, गोरख इरोळे आणि देविदास वाबळे यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते. वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत शेतकऱ्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. प्रशासनाकडून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आणि तांत्रिक त्रुटी दूर करण्याचे ठोस आश्वासन मिळाल्यानंतर शेतकऱ्यांनी आपले आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात मागे घेतले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले असून, जर त्वरित सुधारणा झाली नाही तर आगामी काळात अधिक तीव्र लढा उभारण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## जि. प. शाळा भोसलेवस्ती येथे इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत भावुक आणि हृदयस्पर्शी वातावरणात पार

इंदापूर : (स. गांवकरी)

जि. प. शाळा भोसलेवस्ती येथे इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत भावुक आणि हृदयस्पर्शी वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका सौ. आशा नष्टे यांनी प्रेमळ आणि जिव्हाळ्याच्या प्रास्ताविकाने केली. त्यांच्या प्रत्येक शब्दातून विद्यार्थ्यांबद्दलची माया आणि अभिमान ओसंडून वाहत होता.

विद्यार्थी आणि पालकांनी आपली मनोगते व्यक्त करताना अनेक आठवणींना उजाळा दिला. चार वर्षांचा शाळेतील प्रवास, शिक्षकांचे मार्गदर्शन, मित्रमैत्रिणींसोबतचे क्षण—हे सगळं आठवताच अनेक विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले. निरोपाचा तो क्षण प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करून गेला. शाळा सोडताना विद्यार्थ्यांच्या



मनात आनंद आणि विरह यांचा एक वेगळाच संगम दिसून आला. या प्रसंगी केंद्रप्रमुख संभाजी आजबे यांनी कार्यक्रमास भेट देऊन इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांच्या मनात नव्या आशा आणि उमेदीची ज्योत प्रज्वलित झाली.

यानंतर इयत्ता १ ली ते ४ थीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहभोजनामुळे वातावरणात थोडा आनंदाचा रंग भरला, पण तरीही निरोपाची हुरहूर प्रत्येकाच्या मनात होतीच. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी मनापासून सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन लतीफा पठाण मॅडम, मेघा थोरवे मॅडम, रमेश बरळ सर, समाधान भोंग सर तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी अतिशय उत्तमरीत्या पार पाडले.

## शाओमी टीव्ही एस मिनी एलईडी सिरीज भारतात लाँच

पुणे : (स. गांवकरी)

शाओमी इंडियाने आज भारतात शाओमी टीव्ही एस मिनी एलईडी सिरीजच्या लाँचची घोषणा केली. ही शाओमीची भारतातील पहिली मिनी एलईडी टेलिव्हिजन श्रेणी आहे आणि याद्वारे होम एंटरटेनमेंटच्या अधिक प्रगत व अनुभव-केंद्रित युगात महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. प्रगत मिनी एलईडी तंत्रज्ञानावर आधारित ही सिरीज स्क्रीनवर अधिक कलर डेप्थ आणि स्पष्टता प्रदान करते. यामध्ये अधिक चांगला कॉन्ट्रास्ट, संतुलित ब्राइटनेस आणि अत्यंत तपशीलवार दृश्ये पाहायला मिळतात. यातील रंग अधिक नैसर्गिक दिसतात. शाओमीचे आतापर्यंतचे सर्वात प्रगत डिस्प्ले इनोव्हेशन असलेल्या क्यूडी मिनी-एलईडी तंत्रज्ञानामुळे १२०० नीट्सच्या पीक ब्राइटनेससह हा



डिस्प्ले ब्राइटनेस आणि कॉन्ट्रास्टवर लक्षणीयरित्या अधिक सूक्ष्म नियंत्रण मिळवता येते, जे इतर हाय-एंड डिस्प्ले तंत्रज्ञानाच्या तुलनेत अधिक उत्तम आहे. प्रगत तंत्रज्ञान व्हिज्युअल अनुभवाला अधिक समृद्ध करण्यासाठी यामध्ये ३४ वॅट क्वाड-स्पीकर सिस्टम देण्यात आली आहे, जी शाओमी साउंडसह ट्यून केलेली आहे. तसेच डॉल्बी ऑडिओ, डीटीएस:एक्स आणि डीटीएस व्हर्च्युअल:एक्समुळे आवाजाचा उत्तम प्रभाव निर्माण होतो, जो अधिक व्यापक आणि मनाला भिडणारा वाटतो.

## नाशिकमध्ये राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा उत्साहात

नाशिक : (स. गांवकरी)

आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित “राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा २०२६” हा भव्य आणि प्रेरणादायी कार्यक्रम नाशिक येथे अत्यंत उत्साहात व दिमाखात पार पडला. महिला उद्योजक आणि युवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या सोहळ्याने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री स्वरा राजपूत यांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली आणि नवउद्योजकांना नवे ध्येय मिळाले. संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य संयोजक गणेश रामदास विटकर यांच्या कुशल नेतृत्वाखाली हा सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमात गोदा इंटरटेनमेंटचे दिलीप जाधव, सुप्रसिद्ध निवेदक गणेश मोढवे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उद्योजक, कृषी तज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यात



विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना “राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६” प्रदान करण्यात आला. गायन क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल गायत्री अमोघ कुलकर्णी यांना “सुरेल आवाजाची सृजनहार” या विशेष गौरवासह राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या मधुर आणि प्रभावी गायनामुळे त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले असून त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अहमदाबादमध्ये त्यांच्या प्रवासात गुरुपाल सिंग, संजय तन्ना, वर्षा कुलकर्णी, भावेश व्यास, सीमा पटेल, हार्दिक सोनी, संजीव कीर्तणे, नयना रावल आदी मान्यवरांनी त्यांना पाठिंबा दिला.

## शिर्डीत छावा क्रांतीवीर सेनेचे आमरण उपोषण!

### बालमजुराच्या मृत्यूप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी; महसूल विभागावर संताप!

शिर्डी : (स. गांवकरी)

शिर्डी लगतच्या पिंपळवाडी येथे सुरू असलेल्या अवैध वीट भट्ट्यांमुळे वाढलेल्या प्रदूषण व बालमजुरीच्या गंभीर प्रश्नावरून छावा क्रांतीवीर सेना आक्रमक झाली आहे. दोषींवर तात्काळ कारवाई करावी, या मागणीसाठी संघटनेचे जिल्हा प्रमुख अविनाश शिंदे व उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष संदीप राऊत यांनी शिर्डी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. पिंपळवाडी परिसरातील वीट भट्ट्यांमधून निघणारा धूर व धुळीमुळे नागरिकांमध्ये श्वसनाचे विकार, डोळ्यांचे आजार वाढत असून या प्रदूषणाचा फटका शेती व पिकांनाही बसत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने ठोस पावले न उचलल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे अविनाश शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, या वीट भट्ट्यांवर मोठ्या प्रमाणात बालमजूर कार्यरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. महिनाभरापूर्वी एका १५ वर्षीय बालमजुराचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. मात्र, या प्रकरणाची नोंद केवळ






अकस्मात मृत्यू म्हणून करून तपास थांबवण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या प्रकरणात संबंधितांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा तसेच बालमजुरी रोखण्यासाठी तातडीने सर्वेक्षण करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी केली आहे. ग्रामसभेने यापूर्वीच वीट भट्ट्यांविरोधात ठराव मंजूर करूनही त्याची अंमलबजावणी न झाल्याने संताप व्यक्त करण्यात आला. महसूल विभागाच्या कामकाजाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

शासन स्तरावर ठोस निर्णय होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला आहे. या आंदोलनात संदीप राऊत, संदीप वाघ, अनिल मलदोडे, आकाश गाडे, शुभम शिंदे, आदेश पांगरकर, मंगेश शिंदे, विलास थोरात, जालू बाबा असणे, शाहू रोकडे, अविनाश ससाने, प्रदीप कोते, कुणाल धीवर, विठ्ठल भुजाडे, सुमित सोनवणे, साहिल पठाण, आयान पठाण, अनिल घाडगे, रोहित असणे, मच्छिंद्र आळंजकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

## डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे केले उद्घाटन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन माननीय श्री. संग्राम जगताप (महाराष्ट्र विधानसभेचे आमदार) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अहिल्यानगर परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या




केंद्राचा उद्देश आहे. उद्घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल.

अपॉइंटमेंट साठी कृपया ८९२५५ १०८०७ या मोबाईल क्रमांकावर सम्पर्क संपर्क असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे ६,७३५ चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (लेसिक), कॉर्निया, काचबिंदू, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार, परिणाम सुनिश्चित केले जातील.

या प्रसंगी बोलताना आमदार श्री. संग्राम जगताप म्हणाले, “अहिल्यानगर सारख्या वेगाने विकसित होणाऱ्या भागांमध्ये सुलभ आणि विशेषीकृत आरोग्यसेवेची गरज वाढत आहे. डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने प्रगत नेत्रसेवा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केल्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. यामुळे दृष्टीसंबंधित समस्यांचे लवकर निदान, प्रतिबंध आणि उपचार करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली जाईल.”

डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) यांनी सांगितले, “डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलमध्ये आमचा मुख्य भर प्रगत नेत्रसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यावर आणि उच्च दर्जाची वैद्यकीय गुणवत्ता राखण्यावर आहे. अहिल्यानगर केंद्र हे या वेगाने विकसित होणाऱ्या भागातील रुग्णांपर्यंत विशेष सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे.” श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) म्हणाले,“आम्ही रुग्णकेंद्रित सुविधा उभारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, ज्या मजबूत क्लिनिकल प्रणाली आणि उत्कृष्ट व्यवस्थापनावर आधारित आहेत. हे केंद्र उच्च दर्जाचे उपचार, परिणाम आणि उत्कृष्ट रुग्ण अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे.”

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे



## अर्धापूर येथे विकास कामाच्या नावावर, भ्रष्टाचाराचा कळस

अर्धापूर (स. गांवकरी) : गेल्या दोन वर्षांपासून पासून विविध विकास कामाच्या नावावर अनेकदा रस्ते उकरून भुयारी गटार, नळ योजना, या सारख्या कामासाठी अनेक महिने लोकांना त्रास सहन करावा लागत असून, होणारे रस्त्याचे, नालीचे, भूमिगत गटाराचे करण्यात आलेले काम बोगस असून कुठेही ठरून देण्यात आल्या प्रमाणे कामे झाली नसल्याचे अनेक नागरिकांनी आमदार श्रीजया ताईला निवेदन देऊन सांगितले आहे. तरी पण ही निर्धावलेली व्यवस्था सुधारण्याचे नाव घेत नाही आणि एखाद्या व्यक्तीने या विषयावर काही आवाज उठवला तर नेते व अधिकारी त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसत आहे. बालाजी मंदिर परिसर येथे तर एक इंच उंची चा रस्ता बनविण्यात आला असून तो पाहण्यासाठी अनेक लोक येत असल्याचे दिसत आहे.

## दिव्यांग अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणी आरोपीस विस वर्ष करावास

बिलोली (स. गांवकरी) : नायगांव तालुक्यातील वंजारवाडी येथील घटना, एका दिव्यांग अल्पवयीन मुलीवर लैंगिक आत्याचार / बलात्कार केल्या प्रकरणी दि. २२ एप्रिल रोजी बिलोली येथील जिल्हा न्यायधीश २ तथा अति. सत्र न्यायधीश वि.ब. बोहरा यांनी आरोपी योगेश भिमराव कोंडेवाड वय (३२ ) रा. वंजारवाडी यास कलम लैंगीक अत्याचार अधिनियम कलमा अंतर्गत आरोपीस २० वर्षे सश्रम कारावास व रु.२७ हजार दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ०३ वर्ष अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. मौजे. वंजारवाडी ता. नायगाव, जि. नांदेड येथे दि. ९ नोव्हेंबर २०२३ रोजी संध्याकाळी ७.३० च्या सुमारास आरोपीने पिडित दिव्यांग अल्पवयीन मुलगी तिच्या घरी एकटी असताना तिच्या घरात मागच्या दाराने जावून तिच्या दिव्यांग पणाचा गैरफायदा घेत तिच्यावर बलात्कार केला आहे, अशी. स्वतः पीडिताने उपचारामदरम्यान आरोपीविरूद्ध तक्रार दाखल केली. त्या वरून पोस्टे कुंटूर येथे कलम ३७६ (२) (ल), ४५२ भा.द.वि. व लैंगीक अत्याचार पासून बालकांचे संरक्षण अधिनियम कलम ४ (२), ६ आणि अपंग व्यक्ती अधिकार अधिनियमचे कलम ९२ (ड) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा परिपूर्ण तपास करून सह्याक पोनि. विशाल एन. बहात्तरे यांनी गुन्हाचा तपास परीपुर्ण करून तपास अंती गुन्हाचे दोषारोप मा. अतिरिक्त सत्र न्यायालय बिलोली येथे सादर केले होते. सदर प्रकरणात सरकारतर्फे अभियोग पक्षाने एकूण ८ साक्षीदार तपासण्यात आले. व न्यायालयासमोर आलेल्या साक्षी पुराव्याचा विचार करुन तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तिवाद ग्राहय. धरुन न्यायाधीश बोहरा दि. २२ एप्रिल रोजी आरोपी योगेश भिमराव कोंडेवाड(३२ )वर्षे, यास वरील प्रमाणे शिक्षा ठोठावली आहे. सरकातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता संदीप भिमराव ॲड. कुंडलवाडीकर यांनी बाजू मांडली तर ॲड. जयेश संदीप अग्रवाल, योगेश सतीश पुंड, पैरवी कर्मचारी सपोनि इजूलकंटे, पोहेका सय्यद गौस लिपीक यांनी सहकार्य केले आहे.

## पोलीस प्रशासनाला अखेर आली जाग; रस्त्याने घेतला मोकळा श्वास

तामसा (स. गांवकरी) : हदगांव तालुक्यातील सर्वात मोठ्या बाजारपेठ तामसा असून येथे शहरात दोन महामार्ग असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिशाल कारभारामुळे चक्क रोडवर अतिक्रमण झाल्याने पादचाऱ्यासाठी डोकेदुखी ठरत होते. मागील पंधरवड्यात शिवण कामगाराच्या अपघातात दुर्देवी मृत्यू झाल्याने. भाजपा महिला मोर्चा तालुका अध्यक्ष ममता जोशी यांनी संबंधित विभागाकडे निवेदन देऊन महामार्गावरील नियमाप्रमाणे गतिरोधक, सर्विस रोड, दुभाजका (डिव्हायडर ) बसवण्यात यावं अशी मागणी केल्यावर पोलीस प्रशासनाला जाग आली तामसा येथील कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक सहदेव खेडकर यांनी धुरा हाती घेत महामार्गावरील थांबणाऱ्या हात गाडे,बेशिस्त वाहन, ट्रॅफिक व्यवस्था संबंधितांना कायदेशीर नोटीस बजावत कारवाई सुरू केली असून सर्वसामान्य जनतेने पोलीस प्रशासनाचे आभार मानल्या जात आहे.

## हर्ष मेहता दहावीच्या सीबीएससी पॅटर्न मध्ये यश



तामसा (स. गांवकरी) : श्री चैतन्य टेक्नो स्कूलच्या विद्यार्थी हर्ष मेहता यांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ इयत्ता 10 वी च्या परीक्षेत घणघणीत यश संपादन केलं. नुकत्याच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ इयत्ता दहावीच्या परीक्षा परिणाम घोषीत झाल्या या परीक्षेत श्री चैतन्य टेक्नो स्कूल नांदेड येथील विद्यार्थी हर्ष मनोज मेहता यांनी 93 टक्के मार्क मिळून यश संपादन केलं. या विद्यार्थ्याच्या घणघणीत यशाबद्दल महिला तालुकाध्यक्ष ममता जोशी यांच्या सह तामसावासियां कडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## कर्जत पंचायत समितीत आ. रोहित पवार यांची आढावा बैठक

कर्जत (स. गांवकरी) : कर्जत जामखेड मतदार संघाचे आमदार रोहित पवार यांनी कर्जत पंचायत समितीत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध कामांचा आढावा घेतला. नागरिकांच्या प्रश्नांवर होत असलेल्या विलंबाबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला आणि काही ठिकाणी कामातील त्रुटींवरून खडेबोल सुनावले. शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना वेळेत मिळावा आणि प्रलंबित कामे लवकर पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या आढावा बैठकीस बीडीओ, संबंधित विभागांचे अधिकारी, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने काम करावे, यावर त्यांनी भर दिला. तसेच आ.रोहित पवार यांनी कर्जतमध्ये नागरिकांशी थेट संवाद साधला. कर्जत आणि जामखेड तालुक्यातील नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, शेतीविषयक अडचणी तसेच वैयक्तिक प्रश्न नागरिकांनी मांडले. आ. रोहित पवार यांनी प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ फोन करून सूचना दिल्या आणि नागरिकांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. एकूणच, ग्रामीण भागातील समस्यांची अचूक जाण आणि त्यावर त्वरीत अंमलबजावणी करण्याची त्यांची कार्यशैली पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, कर्जत-जामखेड मतदारसंघाच्या विकासाभिमुख वाटचालीचा विश्वास अधिक दृढ करणारी ठरत आहे.

# तेलंगणा राज्यातुन वाहनातून येत असलेला गांजा केला जप्त

### १७ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल, तर १३ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त




नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड ग्रामीण पोलीसांनी नाकाबंदी केली असता च्या दरम्यान अवैधरित्या तेलंगानातुन महाराष्ट्रात येणारा गांजा पकडून एकुन १७ आरोपीतांन विरूध्द गुन्हा दाखल करून १३, लाख ४०, हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला असून जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत कोम्बिंग आणि नाकाबंदी करूण गुन्हे आणि गुन्हेगारावर आळा घालने व अंतरराज्य अवैध तस्करी रोखण्या संवर्धाने सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने दि २१ एप्रिल रोजी २३ . २३ वाजता पासुन नमूद अधिकारी व अंमलदार होमगार्ड असे चंदासिंग कॉर्नर येथे नाकाबंदी करीत असतांना दिनांक २२ एप्रिल रोजी २. १० वाजताचे सुमारास देगलुर कडुन नांदेड कडे जाणारी एक मारोती कंपनीची कार जिचा पासिंग क्र TS09UC-6085 हे वाहण न थांबता पळून जात होते त्यास पकडून तपासले असता सदर कारच्या पाठीमागील डिक्की मध्ये एक पांढ-या रंगाच्या नायलॉन पिशवी मध्ये खाकी रंगाच्या चिकट टेपने पिशवीला चारही बाजूने गुडांळलेले चौकोणी बॉक्स असलेले ज्यात हिरव्या रंगाचा पाला, काडया, बिया असलेला गांजा मिळून आला सदर कार मध्ये मिळून आलेला मुख्य आरोपी नामे अकबर अहेमद खा पठान यास विचारपुस केले असता त्यांने सांगीतले की सदरचा माल हा माधव विठ्ठल जाधव रा.धर्मापुरी तांडा ता. कंधार यांने बोधन (तेलंगाना) येथुन गाडीत टाकुन दिले व सदर प्रकरणात नमुद १५ आरोपी गांजा वितरण मध्ये सहभागी आहेत असे सांगीतले.

तेलंगाना येथुन सदरचा गांजा हा नांदेड मध्ये वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळ्या प्रमाणात एजेंट यांना पोहचवल्या जाणार होता नांदेड मध्ये प्रवेश करण्या अगोदरच चंदासिंग कॉर्नर येथे सदर गांजा व कार जागीच दोन पंचा समक्ष जप्ती पंचनामा करून ताब्यात घेवुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील दोन आरोपीतांना अटक करण्यात आले असून न्यायालयात पोलीस कस्टडी करता हजर करून ईत्तर १५ आरोपीतांचा शोध सुरू आहे या प्रकरणी पोहेका बापुराव यादव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुर ४३३/ २०२६,कलम २० बी २२बी, २५ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ नुसार दाखल केला आहे.

या शोध कामी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले, पोउपनि बापुराव चव्हाण, पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड पोहेकों पोहेकर, वसंत केंद्र पोकों समीर अहेमद पोकोंशंकर माळगे,पोकों कल्याणकर पोकों पवार,पोकों सिरमलवार पोकों देवकते,पाच होमगार्ड पाच सर्व नेमणूक पो.स्टे. नांदेड ग्रामीण पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

## किनवट रेल्वे स्थानक विकासासाठी विविध मागण्या

किनवट : (स. गांवकरी)



दक्षिण मध्य रेल्वेचे नांदेड विभागीय व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी किनवट येथे पाहणी दौरा केला असता, सामाजिक कार्यकर्ते मारोती मुनेश्वर यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनामध्ये किनवट रेल्वे स्थानकाचा सर्वांगीण विकास करण्यावर भर देण्यात आला. अमृत भारत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा दर्जा व गती वाढवावी, तसेच स्थानकावर तिसऱ्या फलाटाचे काम तात्काळ सुरू करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. याशिवाय, सध्या नांदेड येथे मुक्कामी राहणाऱ्या काही रेल्वे गाड्यांचा विस्तार आदिलाबाद पर्यंत करण्यात यावा, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय कमी होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. स्थानकावरील प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या मूलभूत सोयी-सुविधांमध्ये सुधारणा करण्याची मागणी करतानाच, सध्या निर्माणाधीन असलेल्या दोन्ही भुयारी पुलांचे (अंडरपास) काम वेगाने पूर्ण करावे, अशीही मागणी करण्यात आली. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते रेल्वे स्थानक या मार्गावरील अतिक्रमण हटवून प्रवाशांसाठी सुरक्षित व सुलभ रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी महत्त्वाची मागणीही निवेदनातून पुढे आली. या निवेदनावर पत्रकार प्रमोद पोहरकर, बालाजी सिरसाठ, किरण किनवटकर, फुलाजी गरड, माधव सूर्यवंशी, शुभम शिंदे आणि विजय जोशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. स्थानिक नागरिकांच्या या मागण्यांमुळे किनवट रेल्वे स्थानकाच्या विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## प्रसिद्ध वक्ते डॉ. कुमार विश्वास यांचा सत्कार

### डॉ. कुमार विश्वास हे केवळ कवी नसून आध्यात्मिक आणि सामाजिक प्रबोधन करणारे वक्ते : वसंत लोढा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



डॉ.कुमार विश्वास हे प्रसिद्ध हिंदी कवी, लेखक "अपने अपने राम" आणि "अपने अपने श्याम" यांसारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून भगवान राम आणि श्रीकृष्णांच्या जीवनावर आधारित जीवन व्यवस्थापन आणि समाज व्यवस्थापनावर व्याख्याने देत आहेत.त्यांच्या कथा आणि व्याख्याने तरुणांना जीवन जगण्याची नवी दृष्टी आणि प्रेरणा देणारी मानली जातात थोडक्यात सांगायचे तर, डॉ.कुमार विश्वास हे केवळ कवी नसून आता एक आध्यात्मिक आणि सामाजिक प्रबोधन करणारे वक्ते म्हणून ओळखले जातात. असे प्रतिपादन दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे. "अपने अपने राम" या श्रीराम कथेचे वक्ते डॉ.कुमार विश्वास यांची पंडित दीनदयाळ परीवार प्रतिष्ठानच्या वतीने सदिच्छा भेट देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पंडित दीनदयाळ परिवाराचे संस्थापक वसंत लोढा,सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल,अशोक कानडे,राहुल जामगावकर,निलेश चिपाडे, विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे,इंजिनीयर विजयकुमार पादीर आदी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना डॉ.कुमार विश्वास म्हणाले,पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या सत्काराने मी भारावून गेलो आहे. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने अहिल्यानगर शहरात व्याख्यानमालेच्या माध्यमातून सांस्कृतिक चळवळ चालविली जात आहे.ही व्याख्यानमाला तरुणाईला वैचारिक बळ देणारी आहे.

या व्याख्यानमालेला माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी,केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान,केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर,विश्वास नांगरे पाटील, सत्यपाल सिंह,फैज खान,ॲड.उज्वल निकम, विश्वास नांगरे पाटील,माधवी लता यांच्यासारखे दिग्गज वक्ते या व्याख्यानमालेला उद्बोधन करण्यासाठी येऊन गेले आहेत. व्याख्यानमालेच्या माध्यमातून देशातील सामाजिक व राजकीय प्रश्नांना वाचा फोडणारे व्यासपीठ निर्माण केले आहे.पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे समाजप्रबोधनाचे कार्य कौतुकास्पद आहे.यावेळी सुरज अग्रवाल यांनी आभार मानले.

## किनवट नगरपरिषदेत कर्मचाऱ्यांवर हल्ल्याचा निषेध

### २३ एप्रिलपर्यंत कारवाई न झाल्यास कामबंद आंदोलनाचा इशारा

किनवट : (स. गांवकरी)




किनवट नगरपरिषदेच्या पाणी-पुरवठा विभागातील सफाई कामगारावर नगरसेवकाने केलेल्या कथित मारहाणीच्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत नगर परिषद कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटनेने कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. संघटनेच्या निवेदनानुसार, दिनांक 18 एप्रिल 2026 रोजी दुपारी सुमारे 12:30 वाजताच्या सुमारास पाणी-पुरवठा विभागातील सफाई कामगार नरसिंग गंगाराम रामनवाड हे पाण्याच्या टाकीवर आपले कर्तव्य बजावत असताना नगरसेवक अभय नगराळे यांनी “पाणी वेळेवर सोडत नाही, तुझी झागीर आहे का?” अशा शब्दांत शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कर्मचारी दिव्यांग असल्याने ही घटना अधिक गंभीर असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत संघटनेने पोलिस प्रशासनाकडे संबंधित नगरसेवका विरोधात तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली आहे. दि. 23 एप्रिल 2026 पर्यंत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यास नगरपरिषदेतील सर्व कर्मचारी कामबंद आंदोलन छेडतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

संघटनेने स्पष्ट केले की, आंदोलनाच्या काळात शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि वीज यांसारख्या अत्यावश्यक सेवांवर परिणाम झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील, कर्मचारी जबाबदार राहणार नाहीत. हे निवेदन नगरपरिषद मुख्याधिकारी, पोलीस स्टेशन किनवट तसेच स्थानिक आमदार, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि नगराध्यक्ष यांना देण्यात आले आहे. या निवेदनावर अल्ताफ अब्दुल गफुर, किरण कलगोटुवार, अशोक भालेराव, समुखराव झिंतिज, विजु फुलारी, साहिल काशेटवार, शेख रियाज, राजेश ब्राम्हणे, रवि उप्परवार, आशाबाई दुमटवार, सुरेश पुरुडवार, नरसाबाई कार्लावार, बाबु कल्पेलीवार, आतुल मंत्रीवार, शांताबाई दोंनकोंडवार, ललिताबाई करदपवार, स्वामी मंत्रीवार, शिवराम काईतवाड, इंदु ढंडोरे, मिलिंद घुले, सुधिर सरोदे, परमेश्वर काचमोडे, संदिप ढंडोरे, अब्दुल रज्जाक यांच्यासह नगर परिषदेतील अधिकारी व कर्मचारी स्वाक्ष-या आहेत. या घटनेमुळे किनवट शहरात खळबळ उडाली असून प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आंबेगव्हाणच्या काजलची लोहमार्ग पोलिसात निवड

ओतूर : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील आंबेगव्हाण येथील मथाजी वाघमारे व सुनंदा वाघमारे यांची कन्या काजल मथाजी वाघमारे हिची मुंबई लोहमार्ग पोलिस दलात निवड झाली आहे. नियोजनबद्ध अभ्यास, नियमित सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तसेच जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यामुळे मला हे यश मिळाल्याचे काजलने यावेळी सांगितले. तिच्या या यशामुळे

गावासह संपूर्ण परिसराचा अभिमान वाढला आहे. मथाजी वाघमारे यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. मर्यादित साधनसामग्री असूनही कुटुंबाने काजलच्या शिक्षणाला आणि स्वप्नांना नेहमीच पाठबळ दिले. याच पाठबळामुळे काजलने आपल्या ध्येयाकडे सातत्याने वाटचाल करत यशाचे शिखर गाठले आहे. काजलचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण स्थानिक पातळीवर पूर्ण झाले असून तिने बी. कॉम पदवी पर्यंत शिक्षण घेतले आहे. शिक्षणाबरोबरच तिने पोलीस भरतीची तयारी सुरू ठेवली. पहिल्या प्रयत्नात अपयश आले, मात्र त्यातून खचून न जाता तिने आपली चूक ओळखून अधिक मेहनत घेतली आणि दुसऱ्या प्रयत्नात यश संपादन केले. पोलीस भरती प्रक्रियेसाठी त्यांना गीताराम गायकर व मयूर डुंबरे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र वाचा - डॉ. आनंद कुलकर्णी

निमगाव सावाः (समर्थ गांवकरी)

आपले भूमी ही छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आपण सर्वांनी वाचणे आवश्यक असून त्याचा अंगीकार केल्यास देशाचा सुजाण नागरिक घडेल. असे प्रतिपादन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांनी निमगाव सावा येथे बोलताना केले. श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गाचा निरोप समारंभ कार्यक्रम प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष संदिपान पवार, संस्थेचे सचिव परेश घोडे, प्राचार्य प्रल्हाद शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष परशुराम लगड इत्यादी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. डॉ.कुलकर्णी पुढे म्हणाले की, आपल्या महाराष्ट्राला वैभवशाली संतांची परंपरा आहे.त्यामध्ये माऊली ज्ञानेश्वर आणि तुकाराम महाराज यांचाही संदर्भ देत जे विज्ञानाने नंतर सिद्ध केले ते आधी ज्ञानेश्वरी मध्ये लिहिले गेले होते. ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी, तुकाराम महाराजांची गाथा ही आज अवघ्या जगाला मार्गदर्शक ठरत आहे. आपण सर्व विद्यार्थ्यांनी या सर्व गोष्टींचा विचार करून या थोर महात्म्यांचे संतांचे चरित्र वाचून अंगीकारले पाहिजे असे सांगितले. याप्रसंगी संस्थेचे सचिव श्री परेश शेठ घोडे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या.

## खत वितरणाबाबत पाहणी दौरा

ठाणे : (स. गांवकरी)



ठाणे जिल्ह्यात भविष्यात लागू होणाऱ्या ॲग्री स्टॅक आयडी प्रणालीच्या अनुषंगाने खत वितरण प्रक्रियेत होणाऱ्या बदलांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय समितीने दि. २१ एप्रिल, २०२६ रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा येथे पाहणी दौरा केला. या दौऱ्यात समितीच्या सदस्या सरीता तिरूमला आणि महेश वाकोडे यांनी प्रत्यक्ष भेट देत सध्याच्या प्रणालीचे परीक्षण केले. या भेटीचा मुख्य उद्देश पीओएस (e-Point of Sale) मशीनला ॲग्री स्टॅक आयडीशी लिंक करून शेतकऱ्यांच्या जमीन धारणेनुसार खत वितरण कसे करता येईल, याबाबत प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेणे हा होता. समितीने पडघा येथील दोन कृषी सेवा केंद्रांना भेट देऊन तेथील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी कृषी विकास अधिकारी मुनिर बाचोटीकर व मोहीम अधिकारी महेश बनकर उपस्थित होते. समिती सदस्यांनी संबंधित विक्रेत्यांशी संवाद साधत सध्या सुरू असलेल्या आधार-आधारित खत वितरण पद्धतीबाबत माहिती घेतली. पाहणी दरम्यान समिती सदस्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत सध्याच्या पद्धतीत येणाऱ्या अडचणी, अनुभव आणि अपेक्षा जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी आधार-आधारित प्रणालीमुळे खत वितरणात पारदर्शकता वाढल्याचे नमूद केले; मात्र काही तांत्रिक अडचणींचाही त्यांनी उल्लेख केला. यावेळी समितीने स्पष्ट केले की, भविष्यात ॲग्री स्टॅक आयडी प्रणाली लागू झाल्यानंतर खत वितरण अधिक शिस्तबद्ध आणि अचूक होईल. शेतकऱ्यांच्या जमीन धारणेची नोंद प्रणालीशी जोडली गेल्यामुळे त्यानुसारच खताचे वितरण केले जाईल. यामुळे गैरवापराला आळा बसेल तसेच प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या हक्काचे खत वेळेत मिळण्यास मदत होईल. नवीन प्रणालीमुळे कृषी सेवा केंद्रांवरील विक्रेत्यांना खत विक्री करताना अधिक सुलभता मिळणार असून, अनावश्यक तांत्रिक अडचणी कमी होतील, अशी माहिती समितीने दिली. पाहणी दौऱ्याच्या माध्यमातून संबंधित यंत्रणेला आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भविष्यात खत वितरण अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि शेतकरी-केंद्रित करण्यासाठी ॲग्री स्टॅक आयडी प्रणाली महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास समितीने व्यक्त केला.



ठाणे : दिवा स्टेशन पूर्वेला पुन्हा फेरीवाल्यांचा ताबा. न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात आल्याचे स्पष्ट चित्र दिसू लागले आहे. रेल्वे स्टेशन परिसरात १५० मीटरवर फेरीवाल्यांवर कडक निर्बंध टाकले असताना दिवा स्टेशन पूर्वेला ना फेरीवाला क्षेत्र असताना ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडुन पूर्णतः डोळेझाक केलेली पहावयास मिळत आहे.

(फोटो - संतोष पडवळ )

# थोडक्यात पण महत्वाचे



## गुरुद्वारा परिसरात १७ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही

नांदेड (स. गांवकरी) : नांदेड शहरातील गुरुद्वारा परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने 21 एप्रिल 2026 रोजी नांदेड येथील गुरुद्वारा परिसरात विविध ठिकाणी अचानक धाडी टाकून एकूण 17 तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही केली. या कार्यवाहीत ८ हजार ३०० रुपये दंड वसूल केला. सदर कार्यवाही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.राजाभाऊ बुट्टे व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. शितल चातुरे, डॉ. संजीवनी जाधव, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, केस रजिस्ट्री सहाय्यक सुनील तोटेवाड व एमजीवीएसचे मंगेश गायकवाड तसेच वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर पांचाळ उपस्थित होते. सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे तक्रार नोंदवून नांदेड जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.



## दुकाने जळून खाक ३ कोटी ७४ लाख ८० हजार ८०० रुपयांचे नुकसान

भोकर (स. गांवकरी) : भोकर येथे आगीचा तांडव अनेक दुकाने जळुन खाक यामध्ये एकनाथ परमेश्वर राचुटकर यांचे साईकृपा होलसेल फर्निचर मार्ट आसलेले अंदाजे नुकसान १ कोटी १५ हजार ८०० रुपये. दीपक गोपीनाथ राचूटकर यांचे साईकृपा सीएनसी कारविन मशीन सेंटर यांचे ५६ लाख ६५ हजार रुपये सुरज साईनाथ राचूटकर यांचे तिरूमला सीएनसी कारविन मशीन सेंटर झालेले अंदाजे नुकसान ९२ लाख ९३ हजार रुपये सचिन साईनाथ राचूटकर यांची तिरुमला होलसेल फर्निचर मार्ट झालेले अंदाजे नुकसान १ कोटी ५० लाख ७ हजार रुपये झालेले एकूण अंदाजे नुकसान ३ कोटी ७४ लाख ८० हजार ८०० रुपये आग लागल्याची वेळ दि २२ एप्रिल मध्यरात्री अंदाजे दोन ते अडीच च्या सुमारास दि २२ एप्रिल रोजी पंचनामा केला,पंचनामा वेळी उपस्थित अधिकारी कर्मचारी तहसीलदार विनोद गुंडमवार , अजित कुंभार, परविक्षाधीन तहसीलदार अभयराज नंजुंडे, नायब तहसीलदार प्रशांत कावरे, ग्राम महसूल अधिकारी अनिल मुनेश्वर, महसूल सेवक राहुल कदम, योगेश गोरठकर ,प्रसाद गिरी आदीनी पंचनामा करून भेट दिली.

## सूर्य कोपला उन्हाची तीव्रता अन शेतकऱ्यांची दमछाक

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात तापमानाची तीव्रता प्रचंड प्रमाणात वाढला असुन पारा ४० अंशांवर पोहोचल्याने रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होत आहे.रणरणत्या उन्हामुळे शेतीकामे करताना शेतकऱ्यांची दमछाक होत असून,प्रखर उन्हाचा फटका भाजीपाला आणि फळबागांना बसत आहे.जुन्नर तालुक्यात सध्या कांदा आणि गहू तर उन्हाळी बाजरी देखील काही प्रमाणात काढणी सुरू असून कांदा व गहू काढणी तर उन्हाळी बाजरी काही फुलोऱ्यात,तर काही ठिकाणी कणसांना दाणे लागलेत तर काही काढणीच्या अंतिम टप्प्यात आहे.मात्र,वाढते तापमान आणि मजुरांच्या टंचाईमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत.दुपारी तापमान ४० अंश सेल्सिअस पर्यंत जाते हे जाळणारे तापमान आणि सायंकाळचे ढगाळ वातावरण यामुळे उकाडा वाढला आहे. अवकाळी पावसाच्या भीतीने काढलेले धान्य आणि चारा सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत सुरू आहे. अति उष्णतेमुळे घेवडा, कलिंगड,काकडी,टोमॅटो,पाले-भाज्या आणि तरकारी याशिवाय आंबा,चिक्कू,डाळिंब,आदिवासी भागातील रानमेवा करपू लागला आहे.नवीन लागवड केलेली रोपे कोमेजल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.पाणी टंचाई आणि वाढत्या उष्णतेमुळे पोषक तत्त्वांच्या शोषणात अडथळा येत असल्यानेपिकांची वाढ खुंटली आहे. याचा थेट परिणाम बाजार पेठेतील पालेभाज्यांच्या दरांवर होत असून भाव वधारले आहेत.



# अवैध कत्तल करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई

नगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या पोलीस कारवाईमुळे एकीकडे गुन्हेगारीवर आळा बसताना दिसत असला, तरी दुसरीकडे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या बदलीच्या चर्चांनी राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ उडवली आहे. मात्र, या धडक कारवाईमुळे काही विशिष्ट घटकांमध्ये नाराजी निर्माण झाल्याची चर्चा आहे. जिल्ह्यातील काही व्यक्तींकडून पोलीस अधीक्षकांची बदली व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती अनौपचारिक चर्चांमधून समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनातील निर्णय प्रक्रियेवर आणि कायदा-सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीवर राजकीय दबाव येतो का, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत १ जानेवारी पासून २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे याशिवाय चालू वर्षातही कारवाईची तीव्रता कायम ठेवण्यात



आली आहे. १ जानेवारी २०२६ पासून आजपर्यंत २० गुन्हे दाखल झाले असून ६९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईतून १ कोटी ५८ लाख ५ हजार ७३५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गोवंश गुन्ह्यातील आरोपीच्या सहा टोळ्या ३६ आरोपीना जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक कत्तलखाने बंद पडले आहेत. विशेष म्हणजे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत एमपीडीए (MPDA) कायद्यांतर्गत अनेक आरोपींवर कठोर कारवाई करत त्यांना जिल्ह्याबाहेर हद्दपार केले आहे. तसेच अवैध कत्तलीसाठी आणलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका करून त्यांचे प्राण वाचवण्यात आले आहेत. या सर्व कारवायांमुळे पोलीस प्रशासनाची कडक भूमिका स्पष्ट होत आहे. मात्र, या धडक कारवाईमुळे काही विशिष्ट घटकांमध्ये नाराजी निर्माण झाल्याची चर्चा आहे. जिल्ह्यातील काही व्यक्तींकडून पोलीस अधीक्षकांची बदली व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती अनौपचारिक चर्चांमधून समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनातील निर्णय प्रक्रियेवर आणि कायदा-सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीवर राजकीय दबाव येतो का, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एकूणच, एका बाजूला कठोर कारवाईमुळे गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू असताना, दुसऱ्या बाजूला बदलीच्या चर्चांमुळे जिल्ह्यातील वातावरण अधिकच तापले आहे. आगामी काळात प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात अलीकडच्या काही महिन्यांत धडक मोहीम राबविण्यात येत आहे. कसायांच्या टोळीवर मोक्कासारखी गंभीर कारवाई करण्यात येत आहे. काही कसायांना जिल्ह्यातून हद्दपारही करण्यात आले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात होणारी गोवंशीय जनावरांची कत्तल थांबली गेली आहे. त्यामुळे 'धंदा' बंद पडल्याने कसाई चांगलेच टेन्शनमध्ये आले असून, कसायांकडून पोलीस अधीक्षक घार्गे यांना हटविण्यासाठी जोरदार हालचाली होताना पाहावयास मिळत आहे. मात्र, दुसरीकडे गोवंशीय जनावरांची कत्तलीस लगाम बसल्याने जिल्ह्यातील गोपालक, गोरक्षक, काही महाराजांनी थेट पोलीस अधीक्षक कार्यालयात येऊन एसपी सोमनाथ घार्गे, पोनि किरणकुमार कबाडी यांचा सत्कारही केला आहे.

### कसायांची टोळी टेन्शनमध्ये!

मागील आठवड्यात राज्यातील नऊ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची ऑर्डर निघाली. त्यामध्ये पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे नाव नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पहिल्या यादीत एसपी घार्गे यांचे नाव येणार असे ठामपणे सांगणारेही गोंधळात पडले. घार्गे यांच्या बदलीसाठी प्रयत्न करणाऱ्या कसायांची टोळी अलर्ट मोडवर आली आहे. त्यामुळे आता दुसरी यादी लवकरच येणार असून, त्यामध्ये घार्गे यांचे नाव निश्चित असणारे असे कसायांना सांगत आहे. त्यामुळे घार्गे यांना हटविण्यासाठी हर एक प्रकारे प्रयत्न होत आहे.

### गोरक्षकांमध्ये आनंद!

जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची कत्तल रोखण्यास पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांकडून जोरदार प्रयत्न होत आहे. रात्री-अपरात्री गोरक्षक हे एसपी घार्गे, पोनि कबाडी यांना फोन करून गोमांस वा गोवंशीय जनावरांच्या वाहतुकीबाबत माहिती देत आहे. त्यानुसार स्थानिक पोलीस ठाण्यातील अधिकारी-कर्मचारी यांना तात्काळ घटनास्थळी पाठविले जात आहे. त्यातून कत्तलीसाठी जाणाऱ्या जनावरांची सुटका केली जात आहे. ताबडतोब मदत मिळत असल्याने गोरक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण बनले आहे.

## पुनखेड्यातील विज सुरळीत न झाल्यास आंदोलन



रावेर: (स. गांवकरी)

तालुक्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या पुनखेडा गावचा विज पुरवठा वरंवार हेतुपूर्वक खंडीत करून , येथिल जनतेला नाहक त्रास देण्याचा प्रयत्न केला जात असून , त्यामुळे गावातील नागरिक त्रस्त झाले आहेत. विज पुरवठा सुरळीत न झाल्यास सर्व गांवकरी आंदोलनाच्या पावित्र्यात असून , पुढील होणाऱ्या परिणामांना विज वितरणचे अधिकारी व कर्मचारी राहातील असाआरोप येथिल ग्रामस्तांनी रावेरचे तहसिलदार यांना निवेदनाद्वारे केला आहे. सदरच्या वारंवार होणाऱ्या खडीत विज पुरवठ्यामुळे दैनंदीन जिवनावर त्याचा विपरित परिणाम होत असून , त्याचा बंदोबस्त व्हावा अशी मागणीही दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. याचा परिणाम विषेश शालेय आभ्यासक्रमावर होत असून , उन्हळ्याचे दिवस असल्याने विद्यार्थांना त्याचा त्रास होत आहे. गेल्या महीणा भरापासून वितरण कंपनीकडून अत्यंत अत्यंत त्रासदायक व अन्यायकारक वागणुक दिली जात आहे . रोज पाहाटे सकाळी साडेतिन ते साडे दाहा वाजेपर्यंत खंडीत करण्यात येतो . एवढया दिर्घ कालावधीसाठी बंद ठेवणयासाठी येथिल नागरिकांना कुठलिही सुचना दिली जात नाही.

## 'माँ संतोषी हॉस्टेल'तर्फे बारावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप

### मान्यवरांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

शहरातील आनंद नगर भागातील तुलसी कम्फर्ट हॉल येथे दि २० एप्रिल रोजी माँ संतोषी गर्ल्स व बॉईज हॉस्टेलच्या वतीने बारावी (NEET) विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या दिमाखात पार पडला. आगामी नीट परीक्षेच्या धकाधकीच्या काळात विद्यार्थ्यांना मानसिक पाठबळ आणि शुभेच्छा देण्यासाठी या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शन या कार्यक्रमाच्या आयोजिका माँ संतोषी हॉस्टेलच्या संचालिका सौ. जयश्री संजय जयस्वाल या होत्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अन्नपूर्णा ट्रस्टच्या अध्यक्षा सुषमा गहेरवार, डॉ. हनुमंत भोपाळे, फिजिक्स क्लासेसचे साईकिरण सलगरे, डॉ. गीतांजली श्रीरामे, विष्णू गोडबोले दत्तप्रसाद तालीमकर विजयसिंह गहेरवार यांची उपस्थिती होती.




उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना परीक्षेतील यशासाठी 'गुरुमंत्र' दिला. कठीण परिश्रम आणि योग्य नियोजनाच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन आणि आभार संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन युवा साहित्यिक सोनू दरेगावकर यांनी केले. त्यांनी आपल्या शैलीने कार्यक्रमाची रंगत वाढवली आणि सोहळ्याच्या शेवटी उपस्थितांचे आभारही मानले.

तुलसी कम्फर्ट हॉलमध्ये संपन्न झालेल्या या कार्यक्रमात शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. संचालिका जयश्री जयस्वाल यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. दीर्घकाळ हॉस्टेलमध्ये राहून अभ्यास करणाऱ्या या विद्यार्थ्यांसाठी हा क्षण अत्यंत भावूक आणि तितकाच प्रेरणादायी ठरला. परिश्रम आणि नियोजन हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संजय जयस्वाल यांच्यासह माँ संतोषी हॉस्टेलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्कृष्ठ नियोजनामुळे या कार्यक्रमाची सर्वत्र चर्चा होत आहे.

## जिल्हा परीषदेत बाजीराव कारखिले यांचे सुरू असलेले उपोषण अखेर मागे खासदार निलेश लंके यांनी केली मधस्थी



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

गेल्या तीन दिवसापासून राळेगण थेरपाळ येथील ग्रामपंचायतीच्या दलित सुधार योजनेमध्ये कामाची अनियमितता होती त्या कामाबाबत जिल्सीअहा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्याशी चर्चा केली.

त्यामध्ये जिल्हा परीषदेने पत्र दिले की सात दिवसामध्ये जे जे त्या प्रक्रियेत दोषी असतील सहभागी असतील त्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल असे पत्र दिले आहे त्या पत्रात टेंडर काढण्यासाठी कोणाची सही ,प्रकाशित करण्यासाठी कोणाच्या सहया आहेत या सर्वांवर कारवाई केली जाईल असे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले.

बाजीराव कारखिले म्हणाले अनुसुचित जातीवर नवबौध्द विकास घटकावर राळेगण थेरपाळ जो अपहार झाला होता आम्ही तीन दिवसापासून उपोषण करत होते या ठिकाणी अहिल्यानगर दक्षिणचे खासदार निलेश लंकेनी सीइओ आनंद भंडारीशी चर्चा करून मध्यस्थी करून तोडगा काढलेला आहे सात दिवसाच्या आत यामध्ये असलेले सर्व दोषी ग्रामपंचायत ते जिल्हा परीषद जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे आश्वासन लेखी स्वरूपात उप मुख्य कार्यकारी यांनी दिले आहे सात दिवसात जर कारवाई न झाल्यास आंदोलनाची दिशा वेगळी असेल ती तीव्र स्वरूपाची असेल असे सांगितले.

ग्रामपंचायत सदस्य बाजीराव कारखिले आमच्या राळेगण थेरफड मध्ये दलित वस्ती अंतर्गत जो अपार झालेला आहे तो अपाराच्या सर्व पुरावे माझ्याकडे आता आहेत त्या पुरावाच्या अनुषंगाने पंचायत पारनेर पंचायत समितीचे बीडीओ त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन प्रस्ताव पण पाठवला होता की सदर ग्रामसेवकाला तात्काळ सेवा निलंबित करून निलंबित करण्यात जेणेकरून ग्रामपंचायत दप्तरी कुठलाही बदल होऊ नये. घटनेला पंधरा महिने उलटून अद्याप कुठलेही कारवाई उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेली नाही त्यामुळे आमचे प्रामुख्याने ही मागणी आहे की प्रथमता सदर ग्रामसेवक आढाव बबन दादा राम यांना सेवानिलंबित करून त्यांच्यावरती फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा ही आमचे प्रामुख्याने मागणी आहे.

## अखंड हरिनाम सप्ताह व जन्मोत्सव सोहळा आयोजन

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

नरोबा मंदिर जुना कौठा नांदेड येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्रीराम कथा , नृसिंह जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन 24 एप्रिल ते 1 मे दरम्यान करण्यात आले असून श्रीराम कथाकर हभप रामानुजाचार्य सद्गुरू शिवयोगी वैजनाथ स्वामी नांदेड यांच्या सुमधुर वाणीतुन 24 एप्रिल ते 30 दरम्यान दररोज संगितमय कथा 1 ते 4 आयोजित करण्यात आली असून नृसिंह जन्मोत्सव 30 एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व श्रीराम कथा नृसिंह जन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला असून दैनंदिन काकडा आरती, अभिषेक, ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन,श्रीराम कथा,हरिपाठ हरि किर्तन,होणार असुन या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये हभप गुरुवर्य योगीराज महाराज पैठण,हभप आशाताई राऊत लातुरकर, हभप गुरू राज महाराज देगलूरकर,हभप जगन्नाथ पाटील महाराज,हभप ज्ञानोबा माऊली शिंदगीकर,हभप भगवान महाराज महाआळंगीकर,हभप गणेश महाराज वारंगेकर, 1 मे रोजी काल्याचे किर्तन हभप गणेश महाराज वारंगेकर यांच्ये काल्याचे किर्तन होईल. 30 एप्रिल रोजी नृसिंह जन्मोत्सव निमित्ताने महाअभिषेक श्री मिरवणूक सायंकाळी व जन्मोत्सव महाआरती सायंकाळी होणार असून 1 मे रोजी दुपारी 12 मंदिर विश्वस्त समिती अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे यांच्या कडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.



# जलसंवर्धनाच्या कार्याला नवसंजीवनी देण्याचा संकल्प

जामखेड : (स. गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित ‘गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६’ हा उपक्रम जलसंवर्धन, सांस्कृतिक वारसा आणि अध्यात्म यांचा त्रिवेणी संगम घडविणारा ठरणार असून या माध्यमातून पाणी व्यवस्थापनाच्या कार्याला नवसंजीवनी देण्याचा संकल्प करण्यात आला, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. ही यात्रा विविध भागात जाऊन जनसंवाद साधत व्यापक जनजागृती निर्माण करेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. चौंडी येथे ‘गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६’ नियोजन बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता संजीव चोपडे, अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे , अलका अहिरराव, रवी अनासपुरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.



पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले , पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि जलसंवर्धनाच्या कामांना उजाळा देण्यासाठी या जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पाण्याचे महत्त्व पटवून देत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरेल. राज्यातील विविध नद्यांचे जल एकत्र आणून राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक या यात्रेतून साकार होईल. या संपूर्ण यात्रेत आपण स्वतहा उपस्थित राहणार आहे.

दि. २५ एप्रिल रोजी त्र्यंबकेश्वर येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गोदावरीच्या उगमस्थानातून जलकलश घेऊन यात्रेस प्रारंभ होईल. ही यात्रा नाशिक, सिन्नर मार्गे संगमनेर येथे पहिला मुक्काम करेल. त्यानंतर लोणी मार्गे शिर्डी येथे पोहोचेल. चौंडी येथून निघालेली यात्रा अहिल्यानगर येथे पहिला व शिर्डी येथे दुसरा मुक्काम करेल. तिसऱ्या दिवशी दोन्ही यात्रा एकत्र येऊन संभाजीनगरमार्गे घृष्णेश्वर येथे मुक्कामी राहतील. चौथ्या दिवशी कन्नड-चाळीसगाव मार्गे धुळे येथे मुक्काम होईल, तर पाचव्या म्हणजेच दि. २९ एप्रिल २०२६ रोजी दुपारपर्यंत माहेश्वर येथे पोहोचून मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जलकलशाच्या स्वीकारानंतर यात्रेचा समारोप करण्यात येणार असल्याची माहितीही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी दिली.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, जलसंवर्धन, पाणी व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६' ही प्रभावी ठरणार आहे. दि . २५ एप्रिल रोजी चौंडी येथून जलयात्रेला प्रारंभ होणार असून दुसरी जलयात्रा त्र्यंबकेश्वर येथून निघेल. चौंडी येथून निघणाऱ्या यात्रेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती लाभणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीची माती व सीना नदीतील पवित्र जल घेऊन यात्रा मार्गस्थ होईल. ही ऐतिहासिक घटना असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### सूर्य कोपला उन्हाची तीव्रता अन शेतकऱ्यांची दमछाक

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात तापमानाची तीव्रता प्रचंड प्रमाणात वाढला असुन पारा ४० अंशांवर पोहोचल्याने रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होत आहे.रणरणत्या उन्हामुळे शेतीकामे करताना शेतकऱ्यांची दमछाक होत असून,प्रखर उन्हाचा फटका भाजीपाला आणि फळबागांना बसत आहे.जुन्नर तालुक्यात सध्या कांदा आणि गहू तर उन्हाळी बाजरी देखील काही प्रमाणात काढणी सुरू असून कांदा व गहू काढणी तर उन्हाळी बाजरी काही फुलोऱ्यात,तर काही ठिकाणी कणसांना दाणे लागलेत तर काही काढणीच्या अंतिम टप्प्यात आहे.मात्र,वाढते तापमान आणि मजुरांच्या टंचाईमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत.दुपारी तापमान ४० अंश सेल्सिअस पर्यंत जाते हे जाळणारे तापमान आणि सायंकाळचे ढगाळ वातावरण यामुळे उकाडा वाढला आहे. अवकाळी पावसाच्या भीतीने काढलेले धान्य आणि चारा सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत सुरू आहे. अति उष्णतेमुळे घेवडा, कलिंगड,काकडी,टोमॅटो,पाले-भाज्या आणि तरकारी याशिवाय आंबा,चिक्कू,डाळिंब,आदिवासी भागातील रानमेवा करपू लागला आहे.नवीन लागवड केलेली रोपे कोमेजल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.पाणी टंचाई आणि वाढत्या उष्णतेमुळे पोषक तत्त्वांच्या शोषणात अडथळा येत असल्यानेपिकांची वाढ खुंटली आहे. याचा थेट परिणाम बाजार पेठेतील पालेभाज्यांच्या दरांवर होत असून भाव वधारले आहेत.

### आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत डिंगोरेच्या मुख्याध्यापकांची दिमाखदार कामगिरी

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील डिंगोरे येथील पुष्पावती विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांनी दि. १८ व १९ एप्रिल २०२६ रोजी थायलंड येथे पार पडलेल्या 'जागतिक मास्टर्स चॅम्पियनशिप' या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. वर्ल्ड मास्टर्स फेडरेशनने या स्पर्धा थायलंड येथील शीराचा शहरात आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत भारतासह मलेशिया, श्रीलंका, म्यानमार, थायलंड, फिलीपिन्स आदी देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. ३० भारतीय खेळाडूंचा संघ या स्पर्धेत सहभागी झाला होता. शरद माळवे यांनी ५० ते ५५ या वयोगटात भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करताना लांब उडी, तिहेरी उडी या स्पर्धांमध्ये सुवर्णपदक पटकावले, तर १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रजत पदक मिळविले. त्यांच्या या कामगिरीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकला. चिकाटी, सातत्य, परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर शरद माळवे यांनी हे यश मिळवले असून त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



### यशवंत भिमाजी कानवडे यांचे निधन

संगमनेर खुर्द (स. गांवकरी) : संगमनेर तालुक्यातील निमगाव पागा येथील प्रगतशील शेतकरी यशवंत भिमाजी कानवडे (वय 76) यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी अनुसया कानवडे, दोन मुले अनिल कानवडे,विजय कानवडे, दोन मुली प्रमिला गडाख, रतन ढगे, यांचे ते वडील होत.तसेच सुना,नातवंडे,जावई. असा मोठा परिवार असून, त्यांच्या जाण्याने एक प्रगतशील शेतकरी, व रोज वर्तमानपत्र वाचणारे व्यक्तिमत्व हरपल्याची भावना जणमाणसात व्यक्त होत आहे.

### राहुरीत सकाळी 5 पर्यंत 50% टक्के झाले मतदान

राहुरी (स. गांवकरी) : राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आज 5 वाजेपर्यंत 50 % मतदान झाले . कै . शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरीच्या विधानसभा पोटनिवडणूक होत आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अनुप सिंह यादव यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रशासनाकडून यंदा प्रथमच 374 मतदान केंद्रांवर आधीच साहित्य पोहोच करण्यात आले होते . त्यामुळे ठीक ठिकाणी मतदान केंद्रांवर अधिकारी कर्मचारी आपल्या वाहनाने आले होते .सकाळपासून मतदानासाठी उत्साह कमी दिसून आला . माजी खासदार प्रसाद तनपुरे , त्यांच्या पत्नी डॉ . सौ उषाताई तनपुरे यांनी राहुरी शहरात प्रगती विद्यालयात मतदान केले तर माजी मंत्री व या पोटनिवडणुकीतून माघार घेतलेले प्राजक्त तनपुरे यांनी सकाळी 11 वाजता प्रगती विद्यालयात मतदान केले . कै . शिवाजी कर्डिले यांचे सुपुत्र व भाजपा उमेदवार अक्षय कर्डिले यांनी नगर तालुक्यातील बु-हाननगर येथे मतदान केंद्रात मतदान केले. दरम्यान , राहुरीत प्राजक्त तनपुरे यांनी मतदान झाल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना म्हटले की , मी अजूनही शरदचंद्र पवार राष्ट्रवादीतच असून भाजपात जाण्याचा प्रश्नच नाही . ही सार्वत्रिक नव्हे तर कै . शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे पोटनिवडणूक होत आहे . त्यामुळे आपण माघार घेण्याचा निर्णय घेतला असून सध्या ईडीच्या प्रकरणात यापूर्वीच क्लोजर रिपोर्ट आल्याचे तनपुरेंनी स्पष्ट केले .

# कुकडी प्रकल्पातून कायमस्वरूपी आवर्तन मिळावे

कर्जत (स. गांवकरी)





कायम दुष्काळी व पाण्यापासून वंचित राहिलेल्या सिना लाभ क्षेत्रातील गावांना फायदा व्हावा म्हणून भोसाखिंड प्रकल्प केला. मात्र या बहुचर्चित प्रकल्पाचा कुकडीच्या प्रकल्पातील अतिरिक्त पाण्याशिवाय उपयोग झालाच नाही. मोठ्या प्रमाणात खर्चिक प्रकल्प असताना या भागातील जनतेला हक्काचे पाणी अद्यापही मिळाले नाही. कुकडी प्रकल्पातून कायमस्वरूपी आवर्तन दिल्यास येथील शेती सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल. त्याअनुषंगाने या प्रश्नाबाबत विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे व पालकमंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांच्याकडे निवेदन देऊन सकारात्मक दृष्टिकोनातून निर्णय घ्यावा, अशी विनंती केली आहे.

**- काकासाहेब तापकीर, सभापती - कृऊबा.समिती कर्जत**

कर्जत तालुक्या मधील कायम दुष्काळी भागाला वरदान ठरलेले सिना धरण लाभक्षेत्रामध्ये शेतकऱ्यांकरिता अत्यंत महत्त्वकांक्षी आशा कोट्यावधी रुपये खर्चित असलेल्या भोसा खिंड प्रकल्पास कुकडी प्रकल्पामधून कायमस्वरूपी हक्काचे पाणी आवर्तन देण्यात यावे, अशी मागणी कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर व सिना लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे. या मागणीबाबतचे लेखी निवेदन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा.राम शिंदे आणि जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखेपाटील यांना देण्यात आले आहे. भोसाखिंड प्रकल्पावर आधारित खांडवी, कोंभळी, निमगाव गांगर्डा येथील सिना धरण लाभक्षेत्रातील व परिसरातील इतर गावे अवलंबून आहेत. कर्जत -जामखेडचा हा भाग दुष्काळी असल्याकारणाने पाऊस कधी पडतो तर कधी नाही, यामुळे धरण भरण्यासाठी पुणे जिल्ह्यातील कुकडीच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते.

या प्रकल्पासाठी कुकडी प्रकल्पातील फक्त अतिरिक्त झालेले पाणी दिले जाते. त्यामुळे या भागात पिण्यासाठी व शेतीसाठी पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नाही.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असून वाढत्या तापमानामुळे नैसर्गिक जलस्त्रोताची पाण्याची पातळी खालावली गेली आहे. उन्हाळा आणखीन तब्बल दीड महिना बाकी असून या भागातील बऱ्याच गावांना पाणीटंचाई उदभवण्याची दाट शक्यता आहे.

शासनाने कोट्यावधी रुपये खर्च करून भोसाखिंड प्रकल्पाची निर्मिती केली. मात्र, याचा उपयोग नियमित आवर्तन मिळाल्यास या भागाच्या फायद्याचे ठरेल, व पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल. परंतु प्रकल्पाच्या खर्चित पैशाच्या तुलनेत येथील जनतेला म्हणावे असे मुबलक पाणी मिळत नाही.

या परिसरातील शेतकऱ्यांना देण्यात येत असलेल्या अतिरिक्त पाणी ऐवजी कुकडी प्रकल्पातून भोसा खिंडीसाठी हक्काचे कायमस्वरूपी आवर्तन मिळावे. जेणेकरून या भागातील लोकांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध होईल. अशी मागणी लाभक्षेत्रातील सर्वसामान्य शेतकरी, नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. या अनुषंगाने भोसा खिंड प्रकल्पास कायमस्वरूपी कुकडी प्रकल्पातून आवर्तन दिल्यास लाभक्षेत्रातील गावांचा कायमस्वरूपी प्रश्न मार्गी लागणार आहे.

## 'जादूचे प्रयोग' कार्यक्रमाचे आयोजन

(स. गांवकरी)

श्री बाबासाहेब कवाद सेवाभावी संस्थेचे न्यू इंग्लिश मिडीअम स्कूल पठारवाडी निघोज येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांच्या 'जादूच्या प्रयोगांचे' आयोजन करून विद्यार्थ्यांना मनोरंजनातून विज्ञानाची गोडी लावण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. या अभिनव कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे अध्यक्ष श्री. शांताराम कळसकर, उपाध्यक्ष श्री. प्रकाश कवाद , सेक्रेटरी श्री. वसंत कवाद, प्राचार्य श्री. डायस सर , व्यवस्थापिका सौ. संगीता कवाद, कॉर्डिनेटर मोनिका डायस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेक्रेटरी श्री. वसंत कवाद होते. यावेळी तालुक्यातील अग्रगण्य शिक्षण संस्था या नात्याने भविष्यातही शिक्षण, मनोरंजनासोबतच वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविणारे अनेक अष्टपैलू उपक्रम राबविण्यास संस्था कायमच अग्रेसर राहील असा मानस त्यांनी व्यक्त केला. व्यवस्थापिका सौ. संगीता कवाद यांनी जादूगार प्रकाश शिरोळे व गीतकार अरुण वाळुंज यांचा सन्मान केला. यावेळी केवळ पुस्तकी ज्ञान न देता, मनोरंजनातून शिक्षणाकडे जाण्याचा हा जादूच्या प्रयोगांचा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारा आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले.

सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी आपल्या बहारदार प्रयोगांनी उपस्थितांची मने जिंकली. चेंडूच्या थरारक कसरती, कानातून रुमाल काढणे यांसारख्या खेळांनी विद्यार्थी आश्चर्यचकित होऊन टाळ्यांचा कडकडाट केला. विशेष म्हणजे, शिरोळे यांनी काही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगात सहभागी करून घेतले आणि काही छोट्या जादूच्या क्लृप्त्याही शिकवल्या.

## आवारी यांच्या निवडीने सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी; आमदार लहामटे

### आमदार लहामटे यांना मंत्रीपद मिळाल्याशिवाय शांत बसणार नाही – मच्छिंद्र आवारी

अकोले : (स. गांवकरी)

- आता विकासाचे नवे पर्व: विरोधकांना दाखविणार विकासाचा नवा अजेंडा: मच्छिंद्र आवारी



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या अकोले तालुका उपाध्यक्षपदी अकोले येथील नामांकित उद्योजक तथा अकोले ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेचे संस्थापक संचालक मच्छिंद्र आवारी (एम. एम. शेठ) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते तसेच पक्षाचे ज्येष्ठ नेते ॲड. वसंत मानकर, तालुका अध्यक्ष शरद चौधरी, माजी अध्यक्ष भानुदास तिकांडे व कविराज भांगरे यांच्या उपस्थितीत आवारी यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. अकोले तालुक्यात व्यापारी व सामाजिक क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत असलेले एम. एम. आवारी हे संघटन कौशल्यासाठी ओळखले जातात. त्यांनी यापूर्वी विविध पक्षांत काम करताना विस्तृत जनसंपर्क निर्माण केला आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागातही त्यांचे मजबूत नाते-संबंध असून, याचा फायदा आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये पक्षाला होणार असल्याचा विश्वास पक्ष पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. आवारी यांची निवड ही केवळ औपचारिक नसून, जनतेतून उभा राहिलेला आणि तळागाळाशी जोडलेला नेता पक्षाला मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांत आहे. त्यांच्या माध्यमातून शहर आणि ग्रामीण भागात पक्ष संघटना मजबूत करण्यास गती मिळणार असून नवीन शाखा उभारणीसाठी ते पुढाकार घेतील, अशी अपेक्षा आहे. विशेषतः तरुणांमध्ये असलेली त्यांची पकड आणि ग्रामीण भागातील जनसंपर्क यामुळे विकासाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यास मदत होईल. दरम्यान, "आवारी यांच्या निवडीने सर्वसामान्य कार्यकर्त्यालाही संधी मिळू शकते," अशी भावना अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षात नवचैतन्य निर्माण होईल, असा आशावादही व्यक्त होत आहे. राजकीय वर्तुळात मात्र काही चर्चांनाही उधाण आले असून, "आवारी यांचा मामा होणार नाही ना?" अशा टोमण्याही विरोधकांकडून ऐकू येत आहेत. तरीही आवारी यांच्या कामगिरीवरच त्यांचे भवितव्य अवलंबून राहील, असे निरीक्षकांचे मत आहे. याचवेळी, आमदार डॉ. किरण लहामटे यांना मंत्रीपद मिळावे यासाठी कार्यकर्त्यांचा आग्रह कायम असून, "मंत्रीपद मिळाल्याशिवाय शांत बसणार नाही," अशी भूमिका समर्थकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे येत्या काळात तालुक्यातील राजकीय घडामोडींना अधिक वेग येण्याची शक्यता आहे. आवारी यांच्या निवडीबद्दल अकोले ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेचे चेअरमन नंदकुमार मैड, आर. डी. नवले, ज्ञानेश्वर नवले, बाळासाहेब भोर, राधाकिसन पोखरकर, आप्पासाहेब आवारी, जयदेव आवारी, मारुती भिंगारे, अनिल कोळपकर, सुरेश शिंदे आदींसह विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## जुन्नर तालुका व किशोरवयीन मुलांची अवस्था

(स. गांवकरी)





जुन्नर तालुका मध्ये ११ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलां ची संख्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे २० टक्के असून,अंदाजे ७५ ते ८० हजार मुले या गटात येतात.किशोरवय हा शारीरिक, मानसिक,सामाजिक बदलांचा अत्यंत संवेदनशील टप्पा मानला जातो. "१६ वे वरीस धोक्याचे" ही म्हण या वयोगटा ला लागू पडते,कारण याच काळात मुलं स्वतःची ओळख निर्माण करण्याच्या प्रक्रियेत असतात व अनेक आव्हानांना सामोरे जातात.जुन्नर तालुक्यात या वयोगटातील मुलांना अभ्यासाचा ताण,शारीरिक व मानसिक बदल,तसेच मुलींमध्ये मासिक पाळीशी संबंधित अडचणी यांचा सामना करावा लागतो. कुटुंबातील आर्थिक अडचणी,पालकांशी संवादाचा अभाव आणि मोबाईल सोशल मीडियाचा वाढता प्रभाव यामुळे मानसिक तणाव वाढतो.

आत्मविश्वास कमी होणे, एकटेपणाची भावना,चिडचिडे पणा,प्रेमसंबंधांकडे लवकर आकर्षण तसेच काही ठिकाणी गुन्हेगारी प्रवृत्ती वाढताना दिसते.याशिवाय मुलांमध्ये व्यसनाधीनतेकडे झुकाव वाढताना आढळतो.शिक्षणात खंड पडणे,शाळा सोडण्याचे प्रमाण वाढणे व करिअरविषयी स्पष्ट दिशा नसणे ही मोठी आव्हाने आहेत.मोबाईलचा अतिरेकी वापर वाढत असून काही ठिकाणी सायबर-संबंधित समस्याही समोर येत आहेत, ज्यामुळे मुलांच्या वर्तनावर नकारात्मक परिणाम होत आहे. आदिवासी भागात ही परिस्थिती अधिक गंभीर स्वरूपात दिसून येते.गरीबीमुळे अनेक मुलं आणि मुलींना लहान वयात मजुरी करावी लागते. काही मुली हंगामी कामासाठी (उदा. बनकर फाटा परिसरात) जात असल्याने त्यांचे शिक्षण अर्धवट राहते.दुर्गम भौगोलिक परिस्थिती,वाहतुकीचा अभाव आणि भाषेतील अडथळे यामुळे शाळेत टिकून राहणे कठीण जाते. विशेषतः मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त असून, दहा मुलींपैकी केवळ एक,दोन मुलीच पदवीपर्यंत पोहोचतात.

तथापि,या सर्व अडचणींमध्येही किशोरवयीन मुलांमध्ये सकारात्मक कल दिसून येतो. त्यांना तंत्रज्ञान,क्रीडा,कला व सांस्कृतिक उपक्रमांबद्दल आकर्षण आहे.अनेक मुलांमध्ये कौशल्ये क्षमता असूनही योग्य संधी व मार्गदर्शनाच्या अभावा मुळे फारच कमी मुले पुढे येतात. त्यामुळे पालक,शिक्षक, सामाजिक संस्था आणि समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींनी एकत्रितपणे प्रयत्न करून या मुलांना योग्य दिशा,शिक्षण, समुपदेशन,आरोग्य व पोषण विषयक मार्गदर्शन तसेच उच्च शिक्षणासाठी संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.असे माझे मत आहे.

**शब्दांकन:-अभिजीत मदने**
**सीनियर प्रकल्प अधिकारी**
**चाइल्डफंड इंडिया मढ जुन्नर**
**संकलन:-रविंद्र भोर**
**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,**
**मुबई,पुणे जिल्हा उपाध्यक्ष.**

## महाविद्यालयात पर्यावरण संवर्धनाचा जागर

------ : (स. गांवकरी)

भारत एन्व्हायर्नमेंट कार्यक्रमांतर्गत 'वसुंधरा दिन २०२६ च्या (Earth Day) निमित्ताने येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात पर्यावरण संवर्धनाचा मोठा जागर करण्यात आला.याअंतर्गत आयोजित वसुंधरा सप्ताह पंधरवड्यानिमित्त गुरुवारी महाविद्यालयात 'प्रभात फेरी' काढण्यात आली, तसेच शेकडो विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाची 'शाश्वततेची शपथ' घेतली. वाढते प्रदूषण आणि पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवण्यासाठी तरुणाईचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. याच उद्देशाने न्यू आर्टस् महाविद्यालयात २२ एप्रिल ते २९ एप्रिल २०२६ या कालावधीत 'अर्थ वीक' अंतर्गत विविध जनजागृतीपर उपक्रमांचे (Activities) आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचा एक भाग म्हणून गुरुवारी महाविद्यालयातून एका भव्य प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या हातातील पर्यावरण रक्षणाचे संदेश देणारे फलक आणि घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. प्रभात फेरीनंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी सर्व विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स आणि प्राध्यापकांना शाश्वततेची शपथ दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर म्हणाले , पर्यावरण रक्षण ही आता केवळ सरकारची नाही, तर आपल्या प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. शाश्वत विकास साध्य करायचा असेल, तर तरुणांनी आपल्या रोजच्या सवयींमध्ये निसर्गपूरक बदल करणे काळाची गरज आहे. माझी पृथ्वी, माझी जबाबदारी! मी निसर्गाचा आदर करेन आणि पर्यावरणाचे संरक्षण करेन. मी पाणी आणि विजेची बचत करेन, तसेच त्यांचा अपव्यय जाणीवपूर्वक टाळेन.

# पश्चिमेकडील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबत सरकारला अखेरची संधी

### पश्चिमेच्या पाण्यासाठी प्रतिद्यापत्र सदर करण्यास शेवटची संधी - उच्च न्यायालय

कोपरगाव : (स. गांवकरी)



सह्याद्रीच्या घाटमाथ्याचे पश्चिमेस अरबी समुद्रास जाणारे पाणी गोदावरी नदीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्यासाठी दाखल जनहित याचिकेत सरकारने दुर्लक्ष केल्याने नुकत्याच संपन्न झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने केंद्र आणि राज्य सरकारला पक्षकारांना उत्तर व प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी ०८ मे २०२५ ही"शेवटची संधी" दिली असून त्यात सदरचे काम पूर्ण करण्याची समयसुचिता आणि आर्थिक तरतूद करण्याचे स्पष्ट निर्देश दिल्याने शेतकरी संघटना आणि निळवंडे कालवा कृती समितीने समाधान व्यक्त केले आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की,"सह्याद्रीच्या घाटमाथ्याचे पश्चिमेस अरबी समुद्रास जाणारे पाणी गोदावरी नदीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्यासाठी शेतकरी संघटनेचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नानासाहेब जवरे व सचिव रूपेंद्र काले यांनी दि.०५ जानेवारी २०२४ रोजी जनहित याचिका क्रं.०५/२०२४ ही दाखल केली होती.काही महिन्यापूर्वीच उच्च न्यायालयाने याबाबत सरकारला प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले होते.मात्र त्याला केंद्र आणि राज्य सरकारने दाद दिली नव्हती. याबाबत नुकत्याच संपन्न झालेल्या सुनावणीत शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.अजित काळे यांनी उच्च न्यायालयाच्या न्या.विभा कांकणवाडी व न्या.अजित कडेठाणकर यांचे लक्ष वेधून घेतले होते.केंद्र व राज्य सरकार याबाबत गंभीर नसून केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काम करत असल्याचा आरोप केला होता. राज्यातील शेतकरी रोज आत्महत्या करीत आहेत.एकट्या मराठवाड्यात वर्षाला १० हजार शेतकरी आत्महत्या करीत आहेत.महाराष्ट्रातील ३५० आमदार व ५० खासदार असलेल्या ४०० लोकप्रतिनिधीपैकी बहुसंख्य ग्रामीण भाग व शेतकरी जाती-वर्गातून येतात त्यांना हा प्रश्न अव्वल महत्त्वाचा,सर्वोच्च प्राधान्याचा का वाटत नाही ? असा सवाल विचारला होता.स्वाभाविकपणे येथील जनतेला उच्च न्यायालयाकडून अपेक्षा वाटत असल्याचे म्हटले होते.त्यामुळे प्रस्तावित वळण व उपसा योजनांची तातडीने अंमलबजावणी करावी व पश्चिम घाट माथ्यावरील पाणी आपल्या विभागामार्फत निळवंडे लाभक्षेत्र,नगर नाशिक जिल्ह्यात व मराठवाड्यात वळवणे गरजेचे वाटते. उत्तर कोकणातील नार-पार,अंबिका औरंगा,दमणगंगा,वैतरणा व उल्हास नदी उपखोऱ्यात ३१७ टी.एम. सी.अतिरिक्त पाणी शिल्लक आहे.

पश्चिम वाहिनी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाडयात वळवण्यासाठी प्राथमिक अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने २०१९ रोजी समिती स्थापन केली होती.या समितीच्या अहवालानुसार कोकणातील नार-पार,दमणगंगा,वैतरणा,उल्हास नदी खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात प्रवाही वळण योजनांव्दारे तसेच उपसा नदीजोड/वळण योजनांव्दारे एकूण ८९.९२ टीएमसी पाणी वळविण्याबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे. त्यानुसार जवळपास ७.४ टी.एम. सी.पाणी प्रवाही वळण योजनांद्वारे तर,१५.५ टी.एम.सी.पाणी हे प्रमुख उपसा वळण योजनांद्वारे असे एकूण मिळून २२.९ टी.एम.सी.पाणी वळविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.एकट्या प्रवरा खोऱ्यात १५ टीएमसी पाणी प्रस्तावित आहे.त्यातून निळवंडे धरणाचे लाभक्षेत्र बारमाही सिंचन होऊ शकते.यासाठी ३० प्रवाही वळण प्रस्तावित आहे व ५ बांधकामाधीन वळण योजनांद्वारे १.३५ टीएमसी पाणी वळविले जाईल.तर ११ भविष्यकालीन योजनाद्वारे ४.९८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे प्रस्तावित असल्याची माहिती याचिकाकर्ते नानासाहेब जवरे यांना माहिती अधिकारात मिळाली आहे.मुख्य म्हणजे प्रमुख उपसा वळण योजनेद्वारे जवळपास १५.५५ टीएमसी पाणी वळविण्याचे प्रस्तावित आहे.या योजनेंतर्गत सध्या काही नदीजोड प्रकल्पांवर काम सुरू असल्याचे म्हटले जात आले तरी सरकारची विश्वासार्हता किती ? असा प्रश्न न निर्माण झाला आहे.दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा-देव) नदीजोड योजनेंतर्गत दमणगंगा खोऱ्यात वाल नदीवर निलमाती,वाघ नदीवर मेट व वैतरणा खोऱ्यात पिंजाळ नदीवर कोशिमशेत व गारगाई नदीवर उधळे धरणे अशी धरणे प्रस्तावित आहेत.एकात्मिक जल आराखड्यामध्ये असलेल्या तरतुदीनुसार ८९.९२ टीएमसी अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवणे प्रस्तावित आहे. एकात्मिक जल आराखड्यानुसार चार योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याची माहिती आहे.

सहा योजनांचे संभाव्यता अहवाल पूर्ण,एक सविस्तर प्रकल्प अहवाल पूर्ण.त्यातून २०६.७८ टीएमसी पाणी अपेक्षित आहे. राज्यात चार आंतरखोरे योजनांच्या सुरू असलेल्या कामातून १९१.९० टीएमसी पाणी अपेक्षित.